




# गोदातीर समाचार

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com
RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026








* वर्ष ६४ वे * अंक १४३ * नांदेड * शुक्रवार, दि. ३० मे २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


## वारकऱ्यांना टोलमाफी, विम्याचा लाभ, नोडल अधिकारीही नेमणार; आषाढीनिमित्त एकनाथ शिंदे यांची घोषणा

**मुंबई (प्रतिनिधी)–** आषाढ महिना जवळ येत असल्याने आता पंढरीच्या वारीचे वेध वारकऱ्यांसह शासन आणि प्रशासनलाही लागले आहेत. त्या दृष्टीने सरकारने वारीच्या तयारीला सुरुवात केली आहे. आषाढी वारीनिमित्त वारीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी त्यांचा समूह विमा काढण्यात येईल, तसेच त्यांना दरवर्षीप्रमाणे यावर्षीही वैद्यकीय सेवा पुरवण्यात येतील असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले. आषाढी वारीनिमित्त केलेल्या उपाययोजना आणि वारकऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहात विशेष बैठक पार पडली होती. त्याविषयीची अधिक माहिती प्रसार माध्यमांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते.

नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसामुळे वारी मार्ग कुठेही खराब झाला असल्यास मुरूम, खडी आणि डांबरीकरण करून त्याची तातडीने डागडुजी करावी, वारकऱ्यांना मुबलक पाणी,



विजेची जोडणी, पालखी तळावर वॉटरप्रूफ तंबू उपलब्ध करून घ्यावे. तसेच वारीसाठी जाणाऱ्या गाड्यांना दरवर्षीप्रमाणे टोलमध्ये सवलत दिली जाईल असेही उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, गतवर्षी वारीसाठी येणाऱ्या भाविकांना टोलमाफी करण्यात आली होती. त्यामुळे, यंदाही वाहनाने येणाऱ्या वारकऱ्यांना टोलमाफी मिळणार असल्याचे स्पष्ट झाले.

गतवर्षीप्रमाणे याहीवर्षी आषाढी वारीनिमित्त राज्याच्या आरोग्य विभागाकडून भव्य आरोग्य शिबिरे आयोजित केली जातील, वारकऱ्यांसाठी कार्डीएक रुग्णवाहिकेची सोय उपलब्ध करून दिली जाईल, पंढरपुरात तात्पुरती आयसीयू सुविधा उपलब्ध करून दिली जाईल, या सर्व सोयी उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांनी स्वतः पंढरपूरला जाऊन आढावा घ्यावा असे निर्देश शिंदे यांनी यावेळी त्याना दिले. तसेच प्रत्येक जिल्ह्यातून निघणाऱ्या मोठ्या दिड्यांना वारीच्या काळात पूर्णवेळ सुसज्ज रुग्णवाहिका उपलब्ध करून द्यावी असेही उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

यासोबतच गतवर्षी वारीदरम्यान झालेल्या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या वारकऱ्यांना शासनाद्वारे मदत केली जाईल, पोलिसांशी व्यवस्थित समन्वय व्हावा यासाठी नोडल ऑफिसर नेमण्यात येईल. वारकऱ्यांचे भोजन आणि इतर प्रथा परंपरा वेळच्या वेळी पार पाडाव्यात यासाठी वारी कुठे जास्त वेळ खोळंबणार नाही यासाठी प्रयत्न केला जाईल, यंदाची वारीही स्वच्छ वारी, निर्मल वारी हरित वारी म्हणून आपल्याला पार पाडायची असल्याने त्यासाठी लागेल ते सर्व सहकार्य शासनाकडून केले जाईल असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

## गारगव्हान येथे खदानीत बुडून दोन बालकांचा मृत्यू

### दुसऱ्या दिवशी परिसरात दुसरी घटना

**हदगाव (प्रतिनिधी)–** तालुक्यातील गारगव्हाण येथील खदानीत बुडून दोन बालकांचा मृत्यू झाला आहे. सदर घटना दि. २९ मे रोजी दुपारी १२ वाजेच्या दरम्यान घडली. निखील कुंडलीक वाढवे (१६) रा. गावगव्हान व संघर्ष बाळू पडघणे (१७) रा. असे बुडून मृत्यू झालेल्या दोन बालकांचे नावे आहेत. वरवट येथील घटना ताजी असतानाच परिसरामध्ये दुसऱ्याच दिवशी दुसरी दुर्दैवी घटना घडली आहे. यामुळे परिसरामध्ये हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

गारगव्हाण येथे दि. २९ रोजी विवाह विवाह सोहळ्याला नेवरी येथील संघर्ष बाळू परघणे, निखील कुंडलिक वाढवे आणि त्याचा छोटा बंधू हे विवाह सोहळा आटोपून पोहण्यासाठी गारगव्हाण जवळच असलेल्या खदानीवर गेले. त्यांना पाण्याचा अंदाज आला नसल्यामुळे व त्यांना पोहता येत नसल्याने त्यांचा बुडून जागीच मृत्यू झाला. ही घटना निखीलचा छोटा भाऊ याने गावात येऊन नागरिकांना सांगितली. यानंतर गावातील नागरिकांनी खदानीकडे धाव घेतली. गावकऱ्यांच्या मदतीने दोन्ही बालकांचा मृतदेह खदानीच्या बाहेर काढण्यात आला व शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालय हदगाव येथे पाठविण्यात आला. सायंकाळी



उशिरा त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. गेल्या आठ दिवसांपासून तालुक्यामध्ये अवकाळी पावसाने कहर केल्यामुळे नदी-नाले, खदानी काठोकाठ भरून वाहत आहेत. दोन दिवसांच्या अंतराने ही दुसरी घटना घडली असल्यामुळे तालुक्यात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

सदरील दोन्हीही मयत बालक हे नुकतेच दहावी बोर्डाची परीक्षा चांगल्या प्रकारे गुण घेऊन उत्तीर्ण झाले होते.

## ज्यांच्या घरात पाणी शिरलं त्यांना दहा हजार रुपये देणार –अजित पवार

**पुणे (प्रतिनिधी)–** पावसाळ्यात ज्यांच्या घरात पाणी शिरलं, त्यांना सरकारकडून दहा हजार रूपये देण्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली आहे.

राज्यात गेल्या ४ ते ५ दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू असून मुंबई, पुण्यासह कोकण आणि मराठवाडा, विदर्भातही पावसाचा जोर पाहायला मिळाला आहे. या मान्सूनच्या दमदार आगमनाने शेतकऱ्यांची पीके वाहून गेली असून अनेकांच्या घरातही पाणी फिरलं आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बारातमी मतदारसंघातील अनेक गावात पावसाने धुमाकूळ घातल्याचे पाहायला मिळालं. त्यानंतर, राज्यकर्त्यांनी प्रशासनाला सूचना देत नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार, काही जिल्ह्यात पंचनाम्याला सुरुवात करण्यात आली. मात्र, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पावसामुळे झालेल्या नुकसानग्रस्त भागांची पाहणी केली. यावेळी, ज्यांच्या घरात पावसाचं पाणी शिरलंय त्यांना १० हजार रुपये देणार असल्याची घोषणाच अजित पवारांनी केली.

अजित पवार यांनी गुरूवारी पुन्हा एकदा बारामती मतदार संघातील नुकसानग्रस्त भागांना भेट दिली. त्यावेळी, तालुक्यातील सिद्धेश्वर निंबुडी येथे पावसामुळे नुकसान झालेल्या ठिकाणांची पाहणी केली. त्याम ध्ये रस्ता, ब्रीज, कोसळलेली घरं आणि वीज खांब, वाहून गेलेले रस्ते इत्यादींचा समावेश आहे.



**मुदखेड :** मुदखेड रेल्वे स्टेशन येथे गुरूवारी सकाळी ट्रॅक्टर ट्रॉलीसह रेल्वे पटरीवर पलटी झाला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जिवीतहानी झाली नाही. या घटनेने काही वेळ रेल्वे वाहतूक विस्कळीत झाली होती.

## दुसऱ्या बसमध्ये चढताना बाजूच्या बसने प्रवाशाला चिरडले, अंबाजोगाईत भीषण अपघात

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)–** बीडच्या अंबाजोगाईमध्ये बस स्थानकावर सकाळी भीषण अपघात घडला आहे. दुसऱ्या बसमध्ये चढत असताना बाजूला उभ्या असलेल्या एका बसने प्रवाशाला चिरडले आहे. या अपघातात प्रवासाचा जागीच मृत्यू झाला असून या अपघाता मुळे बस स्थानक परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. अंकुश मोरे असे मृत प्रवाशाचे नाव आहे.

बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई बस स्थानकावर भीषण अपघात झाला आहे. दुसऱ्या बसमध्ये चढताना बाजूने आलेल्या बसने प्रवाशाला चिरडले आहे. यात प्रवाशाचा जागीच मृत्यू झाला आहे. या प्रकारामुळे काही काळ बस स्थानकावर मोठी खळबळ उडाली होती. चालकाच्या हलगर्जीपणामुळे प्रवाशाचा मृत्यू झाल्याने चिंता व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, दोन दिवसांपूर्वीच बीडमधून भीषण अपघाताची घटना समोर आली होती.

**दुसऱ्या घटनेत ६ जणांचा मृत्यू**

बीड जिल्ह्यातून जाणाऱ्या धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील गढी पुलावर भीषण अपघात झाला आहे. हा अपघात इतका भीषण होता की, या अपघातात सहा जणांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला आहे. गेवराई शहरानजीक असणाऱ्या गढी पुलावर एका एसयूव्ही वाहनाचा डिव्हायडरवर धडकून किरकोळ अपघात झाला. या अपघातात कोणीही जखमी झाले नव्हते. मात्र डिव्हायडरमध्ये अडकलेली गाडी बाहेर काढण्यासाठी गाडीतील सर्वजण बाहेर आले. याच दरम्यान महामार्गावरून जाणाऱ्या भरधाव ट्रकने या सहा जणांना जोरदार धडक दिली आणि यात यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.






## पूर्णा-जालना-पूर्णा अनारक्षित साप्ताहिक विशेष गाडी

**नांदेड (प्रतिनिधी)–** उन्हाळी सुट्यात होणारी प्रवाशांची गर्दी लक्षात घेवून दक्षिण रेल्वे ने पूर्णा जालना पूर्णा साप्ताहिक विशेष गाडी चालविण्याचे ठरविले आहे. ही गाडी पूर्णतः अनारक्षित असेल. ही गाडी पुढील वेळापत्रकानुसार धावेल.

गाडी क्रमांक ०७०५७ पूर्णा-जालना विशेष गाडी दि. १ जून २०२५ पासून ते २७ जुलै २०२५ दरम्यान पूर्णा येथून दर रविवारी सायंकाळी ५ वाजता सुटेल आणि ही गाडी, परभणी, मानवत रोड, सेलू, परतूर, मार्गे जालना येथे रात्री २०.५० वाजता पोहोचेल.



गाडी क्रमांक ०७०५८ जालना-पूर्णा विशेष गाडी दिनांक ०५ जून २०२५ पासून ते ३१ जुलै २०२५ दरम्यान जालना येथून दर गुरूवारी सकाळी ९ वाजता सुटेल आणि ही गाडी परतूर, सेलू, मानवत रोड, परभणी मार्गे पूर्णा येथे दुपारी १२.३० वाजता पोहोचेल.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नांदेड विमानतळावर स्वागत

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे गुरूवारी सकाळी येथील श्री गुरुगोविंदसिंघजी नांदेड विमानतळावर आगमन झाले. यावेळी त्यांच्यासोबत वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांचेही आगमन झाले होते. यावेळी त्यांचे स्वागत करण्यात आले.

जिल्हा प्रशासनाच्यावतीने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी त्यांचे स्वागत केले.

यावेळी आमदार आनंदराव तिडके व विविध पदाधिकारी यांची उपस्थिती होती. तसेच यावेळी भाजपचे चैतन्यबापू देशमुख, महानगर अध्यक्ष अमरनाथ राजूरकर, जिल्हाध्यक्ष डॉ. संतुक हंबर्डे, किशोर स्वामी, अमित तेहरा, बाळू खोमणे, प्रवीण साले, शंकरराव मनाळकर, विजय गंभीरे यांची उपस्थिती होती. त्यानंतर परभणी येथील नियोजित कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हेलिकॉप्टरने परभणी कडे प्रयाण केले.



## आरसीबी ९ वर्षांनी फायनलमध्ये! बंगळुरूचा पंजाबवर मोठा विजय



**मुंबई (प्रतिनिधी)–** पंजाब किंग्ज आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात झालेल्या क्वालिफायर १ मध्ये पंजाब किंग्जचा ८ विकेट्सने पराभव झाला. आरसीबीच्या या विजयासह ते आयपीएल २०२५ च्या अंतिम फेरीत प्रवेश करणारा पहिला संघ बनला आहे. ९ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर आरसीबी पुन्हा एकदा आयपीएलच्या फायनलमध्ये प्रवेश करण्यात यशस्वी ठरली आहे.

आयपीएलच्या १८ व्या हंगामाच्या लीग टप्प्यात पंजाब किंग्जने चांगली कामगिरी केली आणि अव्वल स्थानावर राहून प्लेऑफमध्ये प्रवेश केला. पण, क्वालिफायर – १ मध्ये पंजाबचा संघ अपेक्षेनुसार कामगिरी करू शकला नाही. नाणेफेक जिंकल्यानंतर रजत पाटीदारने प्रथम गोलंदाजी करण्याचा घेतलेला निर्णय पूर्णपणे योग्य ठरला.

पंजाबचा संघ ११ वर्षांच्या दीर्घ कालावधीनंतर प्लेऑफमध्ये खेळला आणि त्याचे दडपण संघाच्या प्रत्येक फलंदाजावर दिसून आले. आरसीबीच्या गोलंदाजांनी याचा पुरेपूर फायदा घेतला. फॉर्ममध्ये असलेले फलंदाज प्रियांश आर्य (७), प्रभसिमरन सिंग (१८) आणि कर्णधार श्रेयस अय्यर (२) चौथ्या षटकाच्या समाप्तीपूर्वीच पॅव्हेलियनमध्ये परतले होते. या धक्क्यानंतर पंजाब सावरू शकला नाही. मार्कस स्टोइनिसने (२६) मधल्या षटकांमध्ये काही चांगले शॉट्स खेळून डाव सांभाळण्याचा निश्चितच प्रयत्न केला, परंतु त्याला दुसऱ्या टोकाकडून साथ मिळाली नाही. जोश हेझलवूड आणि सुयश शर्मा यांनी कोणत्याही फलंदाजाला क्रीजवर जास्त वेळ टिकून दिले नाही. परिस्थिती अशी होती की पंजाबचे फक्त ३ फलंदाजच दुहेरी आकडा ओलांडू शकले. अशाप्रकारे श्रेयस अय्यर आणि कंपनीने केवळ १४.१ षटकात फक्त १०१ धावा केल्या.

## संभाव्य पूरपरिस्थितीचा सामना करण्यासाठी 'एसडीआरएफ'ची तुकडी नांदेडात तैनात

### आपत्ती उद्‌भवल्यास कमीत कमी वेळेत घटनास्थळी जाऊन मदत कार्य करा –जिल्हाधिकारी कर्डिले

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यात पावसाळ्यात पूरपरिस्थिती निर्माण होऊन अनेक संकटे उद्‌भवतात. आगामी पूरपरिस्थितीचा धोका लक्षात घेऊन मराठवाडा क्षेत्रासाठी एसडीआरएफची धुळे येथील एक तुकडी नांदेड येथे तैनात करण्यात आलेली आहे. २८ मे रोजी सकाळी ६.३० वा. या तुकडीचे नांदेड येथे आगमन झाले आहे. २८ मे ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीसाठी ही तुकडी नांदेड येथे तैनात राहणार आहे. या तुकडीमध्ये एकूण ३९ जणांचा समावेश असून त्यामध्ये पोलीस उपनिरीक्षक दर्जाचे तीन अधिकारी व बाकी ३५ जवान आहेत.

नांदेड जिल्ह्यात गोदावरी, पैनगंगा, मांजरा, आसना, लेंडी, कयाधू, मन्याड या प्रमुख नद्या असून जिल्ह्यातील ३३७ गावे पूरप्रवण आहेत. राज्य शासनाने 'एनडीआरएफ' च्या धर्तीवर राज्यात येणाऱ्या विविध आपत्तींचा सामना करण्यासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची (एसडीआरएफ) ची स्थापना केली आहे. या टीम ने आज जिल्हाधिकारी व निवासी उपजिल्हाधिकारी यांची भेट घेऊन मराठवाडा विभागातील पूरप्रवण भागाची माहिती घेतली.



कोणतीही आपत्ती उद्‌भवल्यास पिडीत व्यक्तीला पहिल्या एका तासात (गोल्डन अवर) मध्ये मदत मिळाली तर पिडीताचे प्राण आपण वाचवू शकतो. त्यामुळे विभागात कोणतीही आपत्ती उद्‌भवल्यास योग्य समन्वय साधून कमीत कमी वेळेत घटनास्थळी जाऊन मदतकार्य करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी यावेळी या टीमला दिल्या.

या तुकडीचे नेतृत्व पोलीस निरीक्षक राजुक्रिष्ण सुदाम कोल्हे हे करीत आहेत तर पोलीस उपनिरीक्षक दिलीप सडया चौरे, रोहित भीमराव पानपाटील व दिनेश मधुकर तायडे हे त्यांना सहाय्य करीत आहेत. या दलाची राहण्याची व्यवस्था जिल्हा क्रीडा संकुल नांदेड येथे करण्यात आली आहे. ही तुकडी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांच्या मार्गदर्शनाखाली काम करीत असून समन्वय अधिकारी म्हणून जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी किशोर कुऱ्हे हे काम पाहत असून ९४२२८७५८०८ हा त्यांचा मोबाईल क्रमांक आहे.

## मनपा आयुक्त देविदास पवार यांचा १ जून रोजी सेवापूर्ती सत्कार सोहळा

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रशासकीय अधिकारी



देविदास पवार हे भिवंडी महानगरपालिकेच्या आयुक्त पदावरून निवृत्त होत असल्याने त्यांचा सेवापूर्ती सत्कार सोहळा नांदेड येथे रविवार, दि. १ जून रोजी सकाळी १०:३० वाजता कुसुम सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.

राज्य सरकारने नियुक्त केलेल्या विविध ठिकाणी शासकीय नोकरी करत असताना देविदास पवार यांनी कार्यक्षमतेने आणि निष्ठापूर्वक सेवा दिली. त्यांच्या योगदानाचे नेहमीच गौरव होत आला आहे. त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव म्हणून त्यांचा सत्कार सोहळा जन्मभूमीत होत आहे. परभणी व अमरावती येथे महापालिका आयुक्त आणि अंबरनाथ, बदलापूर, लातूर, परळी वैजनाथ, यवतमाळ येथे नगरपालिकेचे मुख्याधिकारी या पदावर सेवा बजावली आहे. आता भिवंडी महापालिका आयुक्त या पदावरून निवृत्त होत आहेत. या सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहन मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार, कृ.उ.बा. समिती, मुदखेडचे संचालक उद्धवराव पवार, निवघेकर आयुर्वेदिक हॉस्पिटल, नांदेडचे संचालक डॉ. विश्वंबर पवार यांनी केले आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. दैविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# शैक्षणिक क्षेत्रामध्ये ट्रम्प यांचा अतिरेक

शिक्षण संस्था म्हणजे केवळ ज्ञान देणारे केंद्र नसून त्या समाजाच्या मूल्यांची, विचारांची आणि स्वातंत्र्याची रक्षक असतात. राजकीय नेतृत्वाने आपले अधिकार वापरताना ही मर्यादा लक्षात घेतली पाहिजे. पण असे होते याचा दावा भारत आणि अमेरिका यांसारख्या देशांनाही करता येत नाही. त्यातल्या त्यात अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा अहंकार, त्यांची एकहटी वृत्ती, आणि सर्वकाही आपल्या मर्जीप्रमाणे घडवण्याची भूमिका यामुळे अमेरिकेसहित संपूर्ण जगामध्ये आर्थिक आणि सामाजिक अस्थिरता निर्माण केली आहे. त्यांच्या ह्या अवगुणांमुळे त्यांच्या नेतृत्वाला योग्य दिशा मिळू शकली नाही. उलटपक्षी, हार्वर्ड विद्यापीठासारख्या संस्थेच्या निर्णायक आणि ताठर भूमिकेने संपूर्ण जगापुढे एक बळकट उदाहरण ठेवले की, शिक्षण आणि विचारसरणीवर दडपशाही शक्य नाही. अमेरिकेच्या राजकारणात व्यक्तिमत्त्वाच्या जोरावर वर्चस्व गाजवणाऱ्या डोनाल्ड ट्रम्प यांच्या कारकीर्दीत अनेक वादंग झाले. त्यांच्या अनेक निर्णयांमुळे देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर अस्थिरतेचे वादळ उठले. त्यांची नेतृत्वशैली म्हणजे गर्जना, अहंकार आणि हुकमी बोलणी यांचे मिश्रण होते. त्यांनी राष्ट्राध्यक्षपदावर येताच युक्रेन-रशिया संघर्ष संपविण्याचा दावा केला होता, पण त्यांच्या सत्ताकाळात हा संघर्ष अधिकच तीव्र झाला. अशा अनेक आंतरराष्ट्रीय अपयशांच्या शृंखलेत एक महत्त्वाचा संघर्ष ठरतो तो ट्रम्प विरुद्ध हार्वर्ड विद्यापीठ. हे जगातील सर्वात प्रतिष्ठित विद्यापीठांपैकी एक. केवळ अमेरिकेतील नव्हे, तर संपूर्ण जगभरातील गुणवंत विद्यार्थ्यांना हे विद्यापीठ एक स्वप्न वाटते. जॉन एफ. केनेडी, बराक ओबामा, रतन टाटा, पी. चिदंबरम यांच्यासारख्या अनेक नामवंतांनी इथून शिक्षण घेतले आहे. परंतु ट्रम्प यांच्या कार्यकाळात, या विद्यापीठावरच केंद्र सरकारकडून दबाव टाकण्याचा प्रयत्न झाला. ट्रम्प सरकारने अमेरिकेतील परदेशी विद्यार्थ्यांबाबत नवा नियम काढून, ऑनलाईन शिक्षण घेणाऱ्यांना व्हिसा नाकारण्याचा निर्णय घेतला. यामुळे हार्वर्डसह अनेक विद्यापीठांच्या हजारो विद्यार्थ्यांचे भवितव्य अधांतरी झाले. भारतासह अनेक देशांतील विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची शैक्षणिक वैधताच प्रश्नात आली. ही कारवाई सरकारच्या अधिकाराचा अतिरेक होती. हार्वर्डने तत्काळ याविरुद्ध मॅसेच्युसेट्समधील जिल्हा न्यायालयात याचिका दाखल केली. या खटल्यात हार्वर्डने स्पष्टपणे सांगितले की, सरकारने प्रक्रिया न पाळता आणि कोणताही ठोस आधार न देता हा निर्णय घेतला आहे. त्याचा परिणाम केवळ संस्थेवर नव्हे, तर हजारो कष्टकरी, अभ्यासू विद्यार्थ्यांवर होणार होता. न्यायालयानेही या बाजूला महत्त्व देत सरकारच्या निर्णयावर तातडीचा स्थगिती आदेश दिला. यामागे एकच संदेश होता की, शिक्षण आणि शैक्षणिक संस्थांना राजकीय कुरघोडीपासून वाचवले पाहिजे. हा केवळ एक कायदेशीर लढा नव्हता. हा संघर्ष होता विचारांचा. ट्रम्प यांचा दृष्टिकोन राष्ट्रवादाच्या टोकावर आधारित होता. त्यांनी 'अमेरिका फर्स्ट'च्या नावाखाली अनेक निर्णय घेतले, जसे की परदेशी कंपन्यांवर आयात शुल्क लादणे, आयफोनचे उत्पादन चीनऐवजी अमेरिकेतच करावे असा आग्रह, आणि शिक्षण संस्थांवर राजकीय दडपशाही. त्यांच्या निर्णयांना नेहमीच 'मी म्हणतो तेच खरं' हा सूर असायचा. दुसरीकडे हार्वर्डसारखी संस्था ही विचारस्वातंत्र्य, आंतरराष्ट्रीय सहकार्य, आणि ज्ञानशक्तीचा किल्ला आहे. ती केवळ शिक्षण संस्था नाही, तर मानवतेच्या मूल्यांची पायाभरणी करणारी प्रयोगशाळा आहे. अशा संस्थेवर राजकीय स्वार्थासाठी हल्ला करणे म्हणजे मूलभूत लोकशाही मूल्यांच्याच मुळावर घाव घालणे होय. ट्रम्प यांच्या सरकारने याआधीही हार्वर्डवर आर्थिक दबाव टाकण्याचा प्रयत्न केला होता. त्यांनी विद्यापीठाला मिळणारा २.२ अब्ज डॉलरचा निधी रोखला होता, जो विविध संशोधन प्रकल्पांसाठी वापरला जात होता. विशेषतः बालकांतील कर्करोग, अल्झायमर, आणि पार्किन्सनसारख्या आजारांवरील संशोधनाचा यामुळे फटका बसला. हे स्पष्ट होते की, विचारस्वातंत्र्याने डाव्या विचारसरणीकडे झुकलेल्या संस्थांवर ट्रम्प प्रशासन सूडभावनेने कारवाई करत होते. अर्थात, यामागे सामाजिक संदर्भही होते. विद्यापीठ परिसरात घडणाऱ्या ज्यू विरोधी किंवा पॅलेस्टिनी समर्थक घटनांवरून ट्रम्प समर्थकांकडून हार्वर्डवर आरोप झाले. मात्र, विद्यापीठ प्रशासनाने अशा घटना हाताळण्यासाठी स्वतंत्र कृती गट स्थापन करून गंभीरपणे कारवाई सुरू केली होती. त्यामुळे ही कारणे केवळ निमित्तमात्र होती, खरे कारण होते ते ट्रम्प यांच्या विचारधारेप्रती हार्वर्डचा विरोध. या संघर्षाचा शेवट काय होईल, याची वेळच उत्तर देईल. मात्र एक गोष्ट नक्की की, शिक्षणाचे व्यासपीठ आणि राजकारण यामधील सीमारेषा पाळणे ही लोकशाहीची खरी परीक्षा आहे. हार्वर्डने ती यशस्वीपणे दिली, आणि ट्रम्प यांच्या अहंकाराने मात्र त्यांची स्वतःचीच प्रतिमा गमावली.

# गरिबी निर्मूलन आणि समृद्धीची पावले



गरिबी ही केवळ आर्थिक समस्या नसून ती एक बहुआयामी समस्या आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये असे नमूद केले आहे की, लोकांना गरिबीत राहण्यास भाग पाडले जाते ते कोणत्याही एका विशिष्ट कारणामुळे नाही तर वेगवेगळ्या कारणांमुळे. अन्न, घर, जमीन, आरोग्य असे गरिबीचे अनेक पैलू आहेत. संयुक्त राष्ट्राचा असा विश्वास आहे की, शाश्वत भविष्य निर्माण करण्यासाठी, आपण गरिबी आणि भेदभाव समाप्त करण्यासाठी आपले प्रयत्न अधिक तीव्र केले पाहिजेत आणि सर्व लोकांना त्यांच्या मानवी हक्कांचा पूर्णपणे आनंद घेता येईल याची खात्री दिली पाहिजे. जागतिक असमानता लॅबने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या जागतिक विषमता अहवाल २०२२नुसार, भारत जगातील सर्वात असमान वेतन, मिळकत असलेल्या देशांपैकी एक आहे.त्यात असे म्हटले आहे की, जगातील सर्वात गरीब लोकसंख्येकडे एकूण संपत्तीच्या फक्त दोन टक्के मालकी आहे, तर जगातील सर्वात श्रीमंत दहा टक्के लोकसंख्येकडे एकूण संपत्तीच्या ७६ टक्के आहे. मध्य पूर्व आणि उत्तर आफ्रिका हे जगातील सर्वात असमान प्रदेश आहेत, तर युरोपमध्ये असमानतेची पातळी सर्वात कमी आहे.

कामातून मिळणाऱ्या एकूण उत्पन्नात महिलांचा वाटा १९९० मध्ये सुमारे ३० टक्के होता जो आजही ३५ टक्क्यांहून कमी आहे. देशातील सर्वाधिक उत्पन्न असलेल्या १० टक्के आणि सर्वात कमी उत्पन्न असलेल्या ५० टक्के लोकांच्या सरासरी उत्पन्नातील अंतर जवळपास दुप्पट झाले आहे. अभ्यासात असेही आढळून आले आहे की, गेल्या चाळीस वर्षांत देश अधिक श्रीमंत झाले आहेत, परंतु त्यांची सरकारे अधिक गरीब झाली आहेत. कोविड महामारीनंतर आलेल्या आर्थिक संकटामुळे गरिबी आणि विषमताही वाढली आहे. २०२२-२३ या वर्षासाठी गरिबी निर्मूलनासाठी आंतरराष्ट्रीय दिवसाची थीम होती सर्वांसाठी सन्मान किंवा आदर. किंबहुना, प्रत्येक माणसाची प्रतिष्ठा किंवा आदर हा त्याचा स्वतःचा मूलभूत अधिकार आहे आणि त्याचे संरक्षण करणे आवश्यक आहे. पण गरिबीत जगणाऱ्या लोकांना स्वतःला उपेक्षित आणि तुच्छ असल्याची भावना वाटते. त्यांना असे वाटते की, त्यांना नाकारले जात आहे आणि त्यांचा अनादर केला जात आहे. गरिबीचे निर्मूलन करणे आणि सर्वत्र शांतता आणि समृद्धी प्रस्थापित करणे हे मानवी हक्कांचे रक्षण करण्याचे प्राथमिक ध्येय असले पाहिजे. परंतु सध्याच्या परिस्थितीत १.३ अब्ज लोक अजूनही गरिबीत जगत आहेत, त्यापैकी जवळजवळ निम्मे मुले आणि तरुण आहेत.

अलीकडच्या काळात, लोकांमधील उत्पन्न आणि संधींच्या असमानतेची पातळी झपाट्याने वाढली आहे. दरवर्षी गरीब-श्रीमंत यांच्यातील दरी रुंदावत चालली आहे. गरीब अधिक गरीब होत असताना अब्जाधीश वर्गाची संपत्ती झपाट्याने वाढत आहे.

खरं तर, गरिबी आणि विषमता हे चुकीचे निर्णय आणि निष्क्रियतेचे परिणाम आहेत. आपल्या समाजातील श्रीमंत गरीब आणि उपेक्षितांना अधिक असुरक्षित बनवतात आणि त्यांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करतात. सामाजिक बहिष्कार, संरचनात्मक भेदभाव आणि अशक्तपणा यासारख्या घटकांमुळे गरिबीत अडकलेल्यांचे जीवन अधिक कठीण होत चालले आहे. याशिवाय दुष्काळ, पूर इत्यादी हवामान बदलाच्या आपत्तींचा परिणामही मुख्यतः गरिबांवरच अधिक होतो. आज जगात आर्थिक विकास, तंत्रज्ञानाची साधने आणि आर्थिक संसाधने वाढल्याचा दावा केला जात असताना, जगातील करोडो लोकांनी गरिबीत जीवन जगावे, असे अजिबात अपेक्षित नाही. कोणत्याही देशातील गरिबांची असहाय स्थिती त्या देशाच्या आर्थिक विकासाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण करते. गरिबी म्हणजे सन्मानाने जगण्याच्या मूलभूत क्षमतेचा अभाव, त्यामुळे गरिबी हा केवळ आर्थिक मुद्दा म्हणून विचार

अशी काही कामे करावी लागतात, की जी त्यांच्या आरोग्यासाठी आणि त्यांच्या जीवासाठी धोकादायक असतात. त्यांना असुरक्षित घरात राहावे लागते.

त्यांना पोषक आहार मिळत नाही. त्यांना न्याय मिळत नाही. त्यांच्याकडे आरोग्य सुविधादेखील मर्यादित आहेत किंवा मर्यादित स्वरूपात पोहचतात. अत्यंत गरिबीच्या परिस्थितीमध्ये भूक आणि कुपोषण, शिक्षण आणि इतर मूलभूत सेवा त्यांच्यापर्यंत मर्यादित स्वरूपातच पोहचतात. सामाजिक भेदभाव, सामाजिक बहिष्कार आणि निर्णय घेण्यात सहभागाचा अभाव यांचा समावेश होतो. झपाट्याने वाढणारी लोकसंख्या, निरक्षरता आणि कमी मानवी विकास, सतत वाढत जाणारी बेरोजगारी, देशांमधील भांडवलाचा अभाव, अविकसित अर्थव्यवस्था, किमतीत वाढ, अर्थव्यवस्थेचे पारंपरिक स्वरूप, पुरेशा कौशल्य विकासाचा अभाव, उद्योजकतेच्या विकासाचा अभाव, योग्य औद्योगिकीकरणाचा अभाव, गरिबी, मागासलेल्या सामाजिक संस्था, भ्रष्टाचार, पायाभूत सुविधांचा अभाव, जमीन आणि इतर मालमत्तेचे असमान वितरण आणि गरिबीचे दुष्ट वर्तुळ ही गरिबीची प्रमुख कारणे आहेत. गरिबीत जगणारे लोक आपल्या मुलांना श्रमिक बाजारात ढकलतात. जगातील ६० टक्के बालमजुरी कृषी क्षेत्रात आढळतात.

या मुलांना अनेकदा धोकादायक परिस्थितीत काम करण्यास भाग पाडले जाते, ज्यामुळे त्यांच्या आरोग्यावर, शिक्षणावर आणि जीवनावर गंभीर परिणाम होतो. गरिबांमधील महिला आणि पुरुषांच्या शालेय शिक्षणातील अंतर सामान्य लोकसंख्येच्या दुप्पट आहे. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमने जारी केलेल्या अहवालानुसार २०३० पर्यंत भारत सुमारे २५ दशलक्ष कुटुंबांना दारिद्र्यरेषेच्या वर आणण्यात यशस्वी होईल आणि दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांचा वाटा १५ टक्क्यांवरून केवळ ५ टक्क्यांवर येईल. भारत सरकारच्या अधिकृत आकडेवारीनुसार २०११ च्या जनगणनेत देशातील सुमारे २२ टक्के लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली होती. कालांतराने देशातील गरिबी कमी झाली आहे, परंतु शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात अजूनही गरिबी कमी होण्याचा वेग कमी आहे. गरिबी निर्मूलनासाठी सरकारने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रमासारख्या अनेक योजना आणि कार्यक्रम सुरू केले आहेत. पण तरीही भारतातील दारिद्र्यरेषा निश्चित करणे हे मोठे आव्हान आहे. आजही असे कोणतेही वैध निकष नाहीत ज्याद्वारे गरिबीची वास्तविक स्थिती परिभाषित केली जाऊ शकते. यासोबतच गरिबी निर्मूलनासाठी संसाधने पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत. दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमातील भ्रष्टाचारामुळे योजनांचा लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही. कार्यक्रम व योजनांची योग्य अंमलबजावणी होत नाही. देशाच्या संसाधनांचा विकास सतत वाढणाऱ्या लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा कमी आहे, त्यामुळे गरिबी निर्मूलन कार्यक्रम देखील अपेक्षित परिणाम देत नाहीत.

दारिद्र्यरेषा निश्चित करण्यासाठी शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करावा, जेणेकरून खऱ्या गरिबांची ओळख होऊन त्यांना सरकारी योजनांचा लाभ देता येईल. ग्रामीण भागातील गरिबांमध्ये मुख्यतः लहान शेतकरी असतात. त्यांची गरिबी दूर करण्यासाठी आणि अन्न सुरक्षा वाढवण्यासाठी कृषी उत्पादकता सुधारणे, संसाधने आणि तंत्रज्ञान आणि बाजारपेठेपर्यंत त्यांचा पोहोच वाढवणे आवश्यक आहे. स्थानिक रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देऊन ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागातील गरिबी कमी करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. गरीब महिलांना शैक्षणिक क्षेत्रात पुढे करून त्यांच्या उत्पन्नाचा स्तर सुधारता येईल. सामाजिक सुरक्षा सुधारण्याबरोबरच गरिबांचे जीवनमान सुधारण्यास, जोखीम चांगल्या प्रकारे व्यवस्थापित करण्यास आणि त्यांच्या मुलांचे आरोग्य आणि शिक्षण वाढविण्यात मदत केली जाऊ शकते. यामुळे लोकांमधील असमानताही कमी होईल. गरिबांना सकस आणि संतुलित आहार देणे अत्यंत आवश्यक आहे, ज्यामुळे त्यांचा शारीरिक आणि मानसिक विकास तर होईलच, पण श्रमाची उत्पादकताही वाढेल.

**-मच्छिंद्र ऐनापुरे**
जत जि. सांगली

# 'शुभ'मन पर्वास सुरुवात



भारतीय क्रिकेट संघ पुढील महिन्यात इंग्लंडच्या दौऱ्यावर जाणार आहे. २० जून पासून सुरू होणाऱ्या या दौऱ्यात भारतीय क्रिकेट संघ ५ कसोटी सामन्यांची मालिका खेळणार आहे. या दौऱ्यापूर्वी भारताचे आधारस्तंभ असलेले अनुभवी रविचंद्रन अश्विन, रोहित शर्मा आणि विराट कोहली या तिघांनी कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती स्वीकारली. भारताचे आधारस्तंभ असलेल्या या त्रिमूर्तीने जवळपास दीड दशके भारतीय क्रिकेटची धुरा वाहिली. त्यामुळे या तिघांच्या निवृत्तीनंतर पहिल्यांदाच भारतीय क्रिकेट संघ कसोटी मालिका खेळतोय तेही इंग्लंड- सारख्या बलाढ्य संघाविरुद्ध आणि तेही त्यांच्याच देशात. त्यामुळे या दौऱ्यात भारतीय संघात कोणते खेळाडू असतील? संघाचा कर्णधार कोण असेल? अश्विन, रोहित आणि विराट या तिघांची जगा कोण भरून काढणार? असे अनेक प्रश्न क्रिकेट चाहत्यांना पडले होते. या प्रश्नाचे उत्तर निवड समितीने नुकतेच दिले.

निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांनी इंग्लंड दौऱ्यासाठी १८ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा केली. हे करताना त्यांनी नव्या कर्णधाराचीही घोषणा केली. भारतीय कसोटी संघाचा नवा कर्णधार म्हणून युवा फलंदाज शुभमन गिलची निवड केली. युवा शुभमन गिल हाच भारताच्या कसोटी संघाचा नवा कर्णधार असेल अशी अपेक्षा होती आणि ती खरी ठरली. मी माझ्या 'भारतीय कसोटी संघाचा संक्रमणकाळ' या लेखात तसे भाकीत वर्तवले होते ते खरे ठरले. शुभमन गिलच्या गळ्यात कर्णधारपदाची माळ टाकून निवड समितीने त्याच्यावर मोठा विश्वास टाकला आहे अर्थात या विश्वासाला तो पात्र ठरेल का? याचे उत्तर आगामी काळात मिळेलच, मात्र त्याच्यावर ही कामगिरी सोपवून निवड समितीने सकारात्मक पाऊल टाकले आहे हे मान्यच करावे लागेल.

शुभमन गिल आता २५ वर्षांचा आहे. अवघ्या २५ व्या वर्षी कर्णधारपदाची माळ गळ्यात पडलेला शुभमन गिल हा पहिला खेळाडू नाही या आधी पतौडी, सचिन तेंडुलकर आणि रवी शास्त्री यांनी २५ व्या वर्षी किंवा त्याआधीच कर्णधारपद भूषवले आहे. सचिनकडे तर अवघ्या २१ व्या वर्षीच ही जबाबदारी आली होती. शुभमन गिलने मागील सात वर्षात जी कामगिरी केली त्या आधारेच त्याला भारतीय संघाचे कर्णधारपद मिळाले आहे. मागील सात वर्षातील त्याची कामगिरी चांगलीच नाही तर विश्वसनीय अशी आहे. या सात वर्षात त्याने फलंदाज म्हणून तर छाप पाडलीच आहे, पण कर्णधार म्हणूनही त्याने स्वतःला सिद्ध केले आहे.

२०१८ मध्ये त्याच्या नेतृत्वाखाली १९ वर्षाखालील भारतीय संघाने विश्वविजेतेपदाला गवसणी घातली होती. या संघाचे नेतृत्व ज्याप्रकारे केले होते ते पाहून तेंव्हाच काही जाणकारांनी तो भविष्यात भारताच्या मुख्य संघाचा कर्णधार असेल असे भाकीत केले होते. ते भाकीत आज खरे ठरले. केवळ १९ वर्षाखालील संघाचीच नव्हे तर आयपीएलमध्ये गुजरात टायटन्स या संघाचे नेतृत्व केले. ते पाहता तो भारतीय संघाचे नेतृत्व करण्यास पात्र असल्याचे सिद्ध झाले. सध्या चालू असलेल्या आयपीएलमध्ये त्याने त्याच्या कुशल नेतृत्वाने गुजरात संघाला प्ले ऑफमध्ये प्रवेश मिळवून दिला. या दरम्यान त्याने फलंदाजीतही चमक दाखवत ६०० च्या वर धावा काढल्या. याच कामगिरीच्या जोरावर त्याला भारतीय कसोटी संघाचे कर्णधारपद मिळाले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

आता २० जूनला तो पहिल्यांदा भारतीय संघाचा कर्णधार म्हणून मैदानात उतरेल त्या क्षणापासून भारतीय क्रिकेटमध्ये! 'शुभ' मन पर्व सुरू होईल. शुभमन गिलची भारतीय संघाच्या कर्णधारपदी निवड झाली असली तरी त्याच्यासाठी हे पद सांभाळणे सोपे नाही. भारतीय संघाचा कर्णधारपदाचा मुकुट हा काटेरी असतो. तो मुकुट धारण करणे म्हणजे साक्षात निखाऱ्यावरून चालण्यासारखे आहे. त्यात शुभमन गिलला जो संघ दिला आहे तो नवखा आहे. या संघात अनेक नव्या खेळाडूंचा समावेश आहे. यातील बहुतेक खेळाडूंना इंग्लंडमध्ये खेळण्याचा अनुभव नाही. बुमरा, पंत आणि के एल राहुल याच खेळाडूंना इंग्लंडमध्ये खेळण्याचा अनुभव आहे. त्यामुळे या नव्या खेळाडूंना घेऊन इंग्लंडसारख्या खडतर दौऱ्यावर जाऊन तिथे जिंकणे हे मोठ्या जिकिरीचे काम शुभमनला करावे लागणार आहे. अर्थात या संघाकडे गमावण्यासारखे काही नाही. मात्र कमावण्यासाठी खूप काही आहे. शुभमन गिलने जर या नवख्या खेळाडूंकडून त्यांच्यातील सर्वोत्तम खेळ करून घेतला आणि आपल्या कुशल नेतृत्वाने भारतीय संघाला विजय मिळवून दिला तर मोठा इतिहास घडेल. अर्थात इतिहास घडवण्याची क्षमता या संघात आणि नव्या कर्णधारात आहे यात शंका नाही. भारतीय संघास आणि भारतीय संघाचा नवा कर्णधार असलेल्या शुभमन गिल यांस खूप खूप शुभेच्छा!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# वेब डिझायनर : सजृनशीलता अणि कौशल्य



ज्यांनी इंटरनेटला दृष्यदृष्ट्या आश्चर्यकारक आणि वापरकर्त्यासाठी अनुकूल स्थान बनवले आहे. मग डिजिटल जगाच्या या अनसन्ग हिरोंना आम्ही आमच्या हॅट्स का टिपतो? सुरुवातीसाठी त्यांच्याशिवाय इंटरनेटची कल्पना करा. हे सूर्यप्रकाशाशिवाय दिवसासारखे आहे, बरोबर? वेब डिझायनर आम्ही दररोज भेट देत असलेल्या वेबसाइट्स बनवतात, त्यांची सर्जनशीलता आणि कौशल्य या साइट्स चांगल्या दिसण्यासाठी आणि सुरळीतपणे काम करतात याची खात्री करण्यासाठी करतात. ते पडद्यामागील विझार्ड आहेत. सर्वकाही क्लिक, स्क्रोल आणि चकचकीत होईल, याची खात्री करून घेतात. परंतु हे फक्त गोष्टी सुंदर बनवण्याबद्दल नाही, हे त्यापेक्षा बरेच काही आहे. वेब डिझायनर डे आम्हांला आमच्या डिजिटल जीवनात वेब डिझाइनच्या महत्त्वपूर्ण महत्त्वाची आठवण करून देतो.

हे वापरकर्त्याच्या अनुभवाबद्दल आणि कार्यक्षमतेबद्दल आहे. वेबसाइट्स केवळ लक्षवेधी नसून नेव्हिगेट आणि वापरण्यासही सोप्या आहेत, याची खात्री करा. हा दिवस वेब डिझायनर्समधील समुदायाला प्रोत्साहन देतो, त्यांना ज्ञान सामायिक करण्यासाठी, सहयोग करण्यासाठी आणि एकमेकांना प्रेरणा देण्यासाठी प्रोत्साहित करतो आणि आपण या डिजिटल कलाकारांना कसे साजरे करू शकता? तुम्ही कौतुकास्पद नजरेने इंटरनेटच्या चमत्कारांमध्ये डुबकी मारू शकता किंवा कदाचित तुमच्या ओळखीच्या वेब डिझायनरपर्यंत धन्यवाद संदेशासह पोहोचू शकता. काही लोक कृतज्ञता दाखवण्यासाठी वेब डिझायनर्सना कॉफी किंवा जेवणासाठी घेऊन जातात. शेवटी, अनेक वेब डिझायनर्स कॅफीनवर भरभराट करतात! वेब डिझाईन वर्कशॉप्स किंवा कॉन्फरन्सेसमध्ये सहभागी होण्यासारखे गुंतण्याचे बरेच मार्ग आहेत, जे शिकण्यासाठी आणि नेटवर्किंगसाठी विलक्षण आहेत. तर, या वेब डिझायनर दिवसात इंटरनेटला आपल्या सर्वांना एक्सप्लोर करायला आवडते. असे ठिकाण बनवण्याच्या कौशल्य आणि सर्जनशीलतेचे कौतुक करण्यासाठी थोडा वेळ का देऊ नये?

साधा धन्यवाद संदेश पाठवून, प्रेरणादायी डिझाईन्स शेअर करून किंवा क्षेत्रात काहीतरी नवीन शिकून असो, प्रत्येक गोष्ट वेब डिझाइनची कला आणि विज्ञान साजरी करण्यास मदत करते. वेब डिझायनर दिवसाचा इतिहास- वेब डिझायनर डे दरवर्षी ३१ मे रोजी साजरा केला जातो, हा सर्जनशील विचारांसाठी एक होकार आहे जे आम्ही दररोज ब्राउझ करत असलेल्या वेबसाइट डिझाइन करतो. या दिवसाची उत्पत्ती स्पष्टपणे दस्तऐवजीकरण केलेली नाही, परंतु डिजिटल युगात त्याचे महत्त्व निर्विवाद आहे. इंटरनेटच्या सुरुवातीच्या दिवसांपासून वेब डिझायनर्सची भूमिका लक्षणीयरीत्या विकसित झाली आहे. सुरुवातीला, वेब डिझाइन खूपच मूलभूत होते, मुख्यतः फक्त साध्या मजकूर पृष्ठांवर लक्ष केंद्रित केले. तथापि, जसजसे इंटरनेट वाढले आणि तंत्रज्ञान प्रगत झाले, तसतसे वेब डिझाइनची जटिलता आणि महत्त्व वाढले. वेब डिझाईन डेव्हलपमेंट- आज आपल्याला माहित आहे की १९९०च्या दशकाच्या मध्यात जोरदार सुरुवात झाली, हा कालखंड वेगवान तांत्रिक प्रगती आणि तथाकथित ब्राउझर युद्धांनी चिन्हांकित केला. या युगात सीएसएस, डायनॅमिक एचटीएमएल आणि जावास्क्रिप्ट सारख्या गंभीर वेब डिझाइन तंत्रज्ञानाचा परिचय झाला, ज्यामुळे अधिक परिष्कृत आणि वापरकर्ता-अनुकूल वेबसाइट्सना अनुमती मिळाली. आज वेब डिझाइन हे सौंदर्यशास्त्राबद्दल आहे आणि वापरकर्ता अनुभव, प्रवेशयोग्यता आणि मोबाइल प्रतिसादाचा समावेश करते, जे आपल्या दैनंदिन जीवनात इंटरनेटची अविभाज्य भूमिका प्रतिबिंबित करते.

वेब डिझायनर डे साजरा करण्यामध्ये वेब डिझाईनमध्ये जाणाऱ्या क्लिष्ट कामाचे आणि सर्जनशीलतेचे कौतुक करणे समाविष्ट आहे. वेब डिझाईनबद्दल अधिक जाणून घेऊन, त्यांना माहित असलेल्या वेब डिझायनर्सचे आभार मानून किंवा फील्ड अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी वेब डिझाइन कोर्स घेऊन लोक हा दिवस साजरा करू शकतात. सोशल मीडियावर थशलऊशीळसपशीऊू या हॅशटॅगसह अनुभव शेअर करणे आणि वेब डिझायनर्सच्या योगदानाची कबुली देणे हा या प्रसंगी साजरा करण्याचा आणखी एक मार्ग आहे. वेब डिझायनर्सचे महत्त्व जास्त सांगता येणार नाही. आम्ही दररोज नेव्हिगेट करत असलेली डिजिटल लँडस्केप तयार करण्यासाठी, आमचे ऑनलाइन अनुभव आनंददायक, प्रवेशयोग्य आणि कार्यक्षम बनवण्यासाठी ते जबाबदार आहेत. अगदी नवीन वेबसाइट विकसित करणे किंवा हौशी वेबमास्टर्ससाठी टेम्पलेट्स वापरणे असो, प्रत्येक वेब डिझायनर विशाल आणि सतत विस्तारणाऱ्या डिजिटल विश्वामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो.

वेब डिझाइनच्या विशाल महासागराचे अन्वेषण करून उत्सवाला सुरुवात करा. फक्त ब्राउझ करण्यासाठीच नाही तर त्यामागील कलात्मकता आणि नाविन्यपूर्णतेची प्रशंसा करण्यासाठी वेगवेगळ्या वेबसाइट्स चाळा. एखाद्या आर्ट गॅलरीला भेट देण्यासारखे विचार करा, जिथे प्रत्येक वेबसाइट कौतुकाची वाट पाहत असलेली उत्कृष्ट नमुना आहे. हे छोटेसे साहस प्रेरणा निर्माण करू शकते किंवा डिजिटल कॅनव्हासेससाठी तुमचे कौतुक वाढवू शकते जे सहसा गृहीत धरले जाते. सोशल मीडियावर तुमच्या आवडत्या वेब डिझायनर्सना ओरडून सांगा. डिजिटल जगाला पडद्यामागील प्रतिभांबद्दल ऐकू द्या, मग ते एक साधे धन्यवाद ट्विट असो किंवा त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य असलेली इंस्टीट्यूट कथा असो. त्यांचे कार्य टॅग केल्याने सकारात्मकता पसरते आणि पडद्यामागील नायकांवर प्रकाश पडतो. लक्षात ठेवा, थोडीशी ओळख एखाद्याचा दिवस उजाळा देण्यासाठी खूप पुढे जाऊ शकते! वेब डिझाईनमध्ये डॅबलिंगबद्दल कधी विचार केला आहे? वेब डिझायनर डे हा प्रारंभ करण्यासाठी योग्य वेळ आहे. अगणित विनामूल्य ऑनलाइन ट्यूटोरियल आणि संसाधनांसह, तुम्हाला उत्सुकता असलेले एक कौशल्य निवडा आणि त्यात प्रवेश करा.

मूलभूत एचटीएमएल/सीएसएस किंवा यूएक्स डिझाइन तत्त्वांसारखे काहीतरी अधिक प्रगत असो, काही तास शिकण्यासाठी समर्पित करा. कुणास ठाऊक? ही कदाचित नवीन छंदाची सुरुवात किंवा करिअर शिफ्ट देखील असू शकते. तुमच्या स्लीव्हवर तुमचे कौतुक का घालू नये- अक्षरशः काही वेब डिझाइन-थीम असलेली व्यापारी वस्तू खेळा किंवा तुमची स्वतःची तयार करा. टी-शर्टवरील विनोदी कोडींग विनोदांपासून ते वेब डिझाइन टूल्सला होकार देणाऱ्या ॲक्सेसरीजपर्यंत, वेब डिझाइन समुदायाबद्दल तुमची प्रशंसा दृष्यदृष्ट्या व्यक्त करण्याच्या मार्गांची कमतरता नाही. शिवाय, आमच्या डिजिटल जगात वेब डिझाइनच्या महत्त्वाबद्दल हे एक उत्तम संभाषण आहे. वेब डिझायनर डे साजरा करण्यासाठी भव्य जेश्चरची आवश्यकता नाही. हे सर्जनशीलता, कौशल्य आणि कठोर परिश्रमाची कबुली देण्याबद्दल आहे जे इंटरनेटला एक दृश्यास्पद आणि कार्यक्षम जागा बनवते. आपण वेब डिझाईनचे शौकीन असाल किंवा उत्तम प्रकारे तयार केलेल्या वेबसाइट्सचे चाहते असाल, या प्रसंगी चिन्हांकित करण्यासाठी बरेच खेळकर आणि विचित्र मार्ग आहेत.

**-कृष्णकुमार निकोडे**
गडचिरोली
मो. ९४२३७१४८८३

## थोडक्यात...

### एचटीबीटी कापसाचे बियाणे खरेदी न करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** शेतकऱ्यांनी एचटीबीटी कापसाचे बियाणे विकत घेवू नये किंवा पेरणी करू नये तर अधिकृत व प्रमाणित कंपन्यांचेच बी. टी. बियाणे खरेदी करावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे. सध्या खरीप हंगाम २०२५ ची लगबग सुरु आहे. ग्रामीण भागात कपाशी लागवडीसाठी बियाणे खरेदीची लगबग सुरु आहे. एचटीबीटी ही एक अनधिकृत जैवतंत्रज्ञान आधारित कापसाची जात आहे. जी अद्याप भारत सरकारकडून अधिकृतपणे मान्यता प्राप्त नाही. एचटीबीटी बियाण्यांचे उत्पादन, विक्री व पेरणी ही अनधिकृत व बेकायदेशीर आहे, असे केल्यास बी.टी. बीज कायदा, पर्यावरण संरक्षण कायदा, व अन्य संबंधित कायद्यानुसार गुन्हा आहे.

### शासकीय तंत्रनिकेतन येथे पदविका प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ

**नांदेड (प्रतिनिधी)–** दहावी व बारावीचा निकाल नुकताच जाहीर झाला असून पॉलिटेक्निकच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेस प्रारंभ झाला आहे. विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी १६ जून २०२५ पर्यत https://poly25.dtemaharashtra.gov.in संकेतस्थळावर अर्ज करता येणार आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी वेळेत ऑनलाईन नोंदणी करावी, असे आवाहन शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. एन.एल. जानराव यांनी केले आहे. विद्यार्थ्यांना प्रवेश फी शासनाच्या नियमानुसार लागू राहील. मोबाईलद्वारे न्ड्राईड किंवा आयओएस स्टोअरवर जावून डीटीई डिप्लोमा डमिशन हे अॅप डाऊनलोड करुन त्याद्वारे देखील विद्यार्थ्यांना अर्ज भरता येईल.

# अवकाळीमुळे नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत द्या

## आमदार बोंढारकरांची कृषिमंत्री कोकाटे यांच्याकडे मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** गेल्या पंधरा दिवसात नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघात झालेल्या अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे शेतीपिकांचे आणि फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यामुळे शेतकरी हतबल झाले आहेत. त्यामुळे नुकसानग्रस्त पिकांचे आणि फळबागांचे त्वरित पंचनामे करावे आणि शेतकऱ्यांना तातडीने अर्थसहाय्य करावे, अशी मागणी नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांनी राज्याचे कृषि मंत्री माणिकराव कोकाटे यांच्याकडे केली आहे. बुधवार दि. २८ मे रोजी मुंबईत आ. बोंढारकर यांनी ना. कोकाटे यांची भेट घेऊन मागणीचे निवेदन दिले.



नांदेड जिल्ह्यात गेल्या पंधरा दिवसांपासून जोरदार पाऊस होत आहे. नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातही या पावसाचा मोठा फटका बसला आहे. बेमोसमी पावसामुळे उन्हाळी पिकांना प्रचंड फटका बसला तर फळबागांचे अतोनात नुकसान झाले आहे. शिवाय पशुधनही या दगावले आहे. त्यामुळे शेतकरी पेरणीपूर्वीच हवालदिल झाला आहे. सततच्या अवकाळी पावसामुळे आणि वादळी वाऱ्यामुळे केळी, ऊस, ज्वारी, मका, बाजरी, आंबा, भुईमूग, हळद आणि इतर पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे.

अशा परिस्थितीत नैसर्गिक संकटात अडकलेल्या शेतकऱ्यांना सावरण्यासाठी राज्य सरकारने तातडीने नुकसानग्रस्त भागाचे पंचनामे करावेत आणि शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी केली आहे.

# पुण्यश्लोक महाराणी अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीवर्षानिमित्त शहरात उद्या शोभायात्रा

**नांदेड (प्रतिनिधी)–** अठराव्या शतकातील जगातील सर्वोत्कृष्ट महिला शासक म्हणून ज्यांचा ब्रिटिश पार्लमेंटने गौरव केला आहे, अशा लोककल्याणकारी राज्यकर्त्या पुण्यश्लोक महाराणी अहिल्यादेवी होळकर यांचे हे त्रिशताब्दी जयंती वर्ष आहे. पुण्यश्लोक महाराणी अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्य व कर्तृत्वाचा उचित सन्मान म्हणून देशभरात त्रिशताब्दी जयंती वर्ष हे अतिशय उत्सहात साजरे होत आहे. त्याचाच भाग म्हणून नांदेड शहरात शनिवार दि. ३१ मे रोजी सकाळी १० वाजता शोभायात्रा व रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.



ही शोभा यात्रा डी. जे. मुक्त आणि ढोल पथकाच्या गजरात काढण्यात येणार आहे. सकाळी १० वाजता शिव मंदीर चैतन्य नगर नांदेड येथून निघणार आहे. ही शोभायात्रा राज कॉर्नर, वर्कशॉप, श्रीनगर, महात्मा फुले पुतळा चौक आय. टी. आय. मार्गे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नियोजित स्मारक स्थळ विसावा उद्यान, व्ही. आय. पी. रोड नांदेड येथे पोहोचल्यानंतर शोभायात्रेचा समारोप होणार आहे. यावेळी अन्नदान करण्यात येणार आहे. या शोभायात्रेस खासदार, आमदार तसेच लोकप्रतिनिधींना समितीच्या वतीने आमंत्रित करण्यात आले आहे.

या शोभा यात्रेत नांदेड शहरातील तसेच संपूर्ण जिल्ह्यातील इतिहास प्रेमी जनतेनीं मोठ्या संख्येने उपस्थित राहून शोभायात्रेची शोभा वाढवावी, असे आवाहन महेंद्र देमगुंडे, जयंती मंडळाचे अध्यक्ष प्रदीप सरोदे, गजानन सरोदे, भास्कर तळणे, पाराजी देवदे. सगर काकडे, विठ्ठल काळे, श्रीहरी मुंडकर, प्रेम वीर आदींनी केले आहे.

# फौजदार सावंत आणि अंमलदार बोईनवाड यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)–** बारड पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक भगवान सावंत (वय ५६) यांचे गुरुवार दि.२९ मे रोजी अपघाती निधन झाले. रात्री ८.३० वाजता त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले. तसेच पोलीस मुख्यालयातील पोलीस अंमलदार गोविंद काळबा बोईनवाड यांचे निधन झाले आहे. त्यांच्यावर गुरुवारी ढाकणी (ता. लोहा) येथे अंतिमसंस्कार करण्यात आले.

पोलीस उपनिरीक्षक भगवान सखाराम सावंत त्यांची अंत्ययात्रा राहत्या घरुन, महावीरनगर येथून गुरुवार रात्री ८.३० वाजता निघून गोवर्धन घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगी किरण, जावई प्रविण गव्हाणे, भाऊ ईश्वर सावंत, पांडुरंग सावंत, पुतणे- पुतणी असा मोठा परिवार आहे, नांदेड जिल्हा पोलीस दलातील मुख्यालय येथे कार्यरत पोलीस अंमलदार गोविंद काळबा बोईनवाड यांचे बुधवारी २८ मे रोजी निधन झाले. काही दिवसांपासून ते आजारी होते. गुरुवारी दि. २९ मे रोजी मौजे ढाकणी (ता. लोहा) येथे त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले आहेत. त्यांच्या पश्चात परिवार आहे.

# शिक्षक संघटना समन्वय समितीची जि.प. समोर धरणे



**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक व्हावी यासाठी शिक्षक संघटना समन्वय समितीच्यावतीने दि.२९ मे रोजी जिल्हा परिषदेसमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

पात्र शिक्षकांतून विपय शिक्षक, पदोन्नत मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख व शिक्षण विस्तार अधिकारीपदी पदोन्नती करावी, पात्र शिक्षकांस निवडश्रेणी, चटोपाध्याय वेतनश्रेणी, पदवीधर वेतनश्रेणी लागू करावी, ३ टक्केमधून नियुक्त शिक्षक वगळून संवर्ग १ मधील शिक्षकांची प्रमाणपत्रासह शारीरिक पुनर्तपासणी करावी, पदभार/कार्यभार शासन निर्णयानुसारच द्यावा, वेतन देयक तयार करण्याचे सर्व डीडीओ १ यांना प्रशिक्षण द्यावे यासह अन्य विविध मागण्यांसाठी हे धरणे आंदोलन करण्यात आले.

यावेळी खा. रवींद्र चव्हाण यांनी आंदोलनकर्त्यांशी संवाद साधला. या आंदोलनात, अखिल शिक्षक संघटना, शिक्षक संघ (थो.), 'आस' शिक्षक संघटना, पुरोगामी शिक्षक संघटना, शिक्षक समिती, वहुजन शिक्षक महासंघ, शिक्षक कॉंग्रेस, इब्टा शिक्षक संघटना, कास्ट्राईव शिक्षक संघटना, राष्ट्रवादी शिक्षक संघटना, टाईड्स शिक्षक संघटना, शिक्षक संघ (शि.), शिक्षक भारती, पंजावराव देशमुख, वहुजन अधिकारी कर्मचारी महासंघ आदी शिक्षक संघटनांनी सहभाग घेतला.

# सिडको बालाजी मंदिर येथील वार्षिक ब्रम्होत्सवामध्ये हभप माजलगावकर यांच्या भागवत कथेला सुरुवात

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** सिडको येथील श्री भगवान बालाजीं मंदिराचा ३५ वा वार्षिक ब्रम्होत्सव २८ मे ते ५ जूनपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. भागवत कथाकार हभप अनिल महाराज माजलगावकर यांच्या भागवत कथेला सुरूवात झाली आहे.

प्रारंभी दिव्युश महाराज यांच्या उपस्थितीत महाआरती करण्यात आली. आचार्य पंडित सतिश गुरू व मंदिर पुजारी व्दियांशु महाराज यांच्या आचार्य तत्वाने अभिषेक होमहवन, यासह विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न होत आहेत.



दि.२८ मे पासून हभप अनिल महाराज माजलगावकर यांच्या भागवत कथेला सुरूवात झाली. रामचंद्र शंकरराव कोटलवार हे यजमान आहेत. ४ जून रोजी सायं ७ वाजता श्री भगवान बालाजी व लक्ष्मी पद्मावती उत्सव मुर्ती मिरवणूक मंगल गिरी वाहनातून काढण्यात येणार आहे. पारंपरिक वाघवृंद बॅण्ड बाजा, फटक्याचा आतिषबाजी व कलशधारी महिलांसह भाविक भक्तांची या मिरवणुकीत उपस्थिती राहणार आहे.

५ जून रोजी हभप अनिल महाराज माजलगावकर यांच्या काल्याचा किर्तनाने व महाप्रसादाने सांगता ब्रम्होत्सवाचा समारोप होणार आहे. या सर्व कार्यक्रमांना भक्तांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन अध्यक्ष साहेबराव जाधव, सचिव बाबुराव बिरादार, व्यंकटराव हाडोळे, विश्वस्त सदस्य तुकाराम नांदेडकर, आनंद बासटवार, डॉ. नरेश रायेवार, गोविंद सुकेवार, पुरुषोत्तम जवादवार, वैजनाथ मोरलवार, रामचंद्र कोटलवार, पुंडलिक बिरादार, सर्व उत्सव समिती श्री भगवान बालाजी मंदिर, सिडको, नांदेड यांनी केले आहे.

# रामकथेसाठी सद्गुरू नराश्याम महाराजांचे शिष्यगण रामेश्वरला रवाना

## शुक्रवारी सुरु होणाऱ्या सप्ताहात ५५० भाविकांचा सहभाग

**नांदेड (प्रतिनिधी) –** लघु आळंदी म्हणून ख्यातकिर्त असलेल्या श्री क्षेत्र येवती (ता. मुखेड) येथील सद्गुरु नराश्याम महाराज संस्थानच्या शिष्यगणांचे बुधवारी (दि. २८) दोन जत्थे रामेश्वर येथे रवाना झाले. यावेळी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. दि. ३० मे रोजी रामेश्वर येथे रामकथेला सुरुवात होणार आहे. दरम्यान, विनोद जोशी येवतीकर उर्फ बाळू महाराज राम कथास्थळी अगोदरच पोहोचले असून तेच भाविकांचे स्वागत करतील.

नराश्याम महाराजांचा शिष्यगण संपूर्ण महाराष्ट्रात पसरला असून वर्षात विविध प्रसंगी हे भक्तगण एकत्र येत असतात. त्यापैकी रामकथा किंवा भागवत कथा हे एक माध्यम आहे. दरवर्षी देशभरातील वेगवेगळ्या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी स्वतः श्री नराश्याम महाराजांच्या कल्पकतेतून या कथेचे आयोजन केले जाते. यापूर्वी काशी (उत्तर प्रदेश), जगन्नाथपुरी (ओरीसा), मागील वर्षी श्रीक्षेत्र द्वारका (गुजरात) आणि यावर्षी रामेश्वर (तामिळनाडू) येथे सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

अध्यात्माची पर्यटनाशी सुरेख सांगड घातली जात असल्याने भक्तगण सुद्धा सहकुटुंब आनंदाने सहभागी होतात. निवास व भोजन व्यवस्थेवर श्री नराश्याम महाराज यांचे जातीने लक्ष असते. त्यामुळे भाविकांची कुठेही गैरसोय होत नाही. बुधवारी (दि. २८) सकाळी ८ वाजता देवगीरी या गाडीने



२७५ भाविक श्री हेमंत बेंडे, दत्ता पाटील यांच्या नेतृत्वाखाली रवाना झाले. दुपारी १२ वाजता ओखा-रामेश्वर या गाडीने स्वतः सद्गुरू नराश्याम महाराज यांच्या उपस्थितीत राजेश जाधव, नंदू सावकार, महेश धुमशेटवार, चंदू सावकार, व्यंकट पदमवार, संतोष अण्णा महेंद्रकर, संतोष मेडेवार, कोटगिरे सावकार .यांच्या नेतृत्वाखाली १७५ जणांचा दुसरा जत्था रवाना झाला. काही भाविक विमानाने तर काही भाविक स्वतःच्या नियोजनानुसार रस्ते मार्गे जाणार आहेत. रेल्वेमध्ये फराळ व जेवणाची सोय करण्यात आली असून हे जत्थे गुरुवारी रात्री रामेश्वर येथे पोहोचले. शुक्रवारी (दि. ३०) राम कथाकार सुनील महाराज हे रामकथेचे निरुपण करणार आहेत. या रामकथेत राज्यभरातील सुमारे ५५० भाविक सहभागी झाले आहेत. रामायणातील काही दृश्य प्रसंग सुद्धा सप्ताहात सादर केले जातात, हे या सप्ताहाचे वैशिष्ट्य ठरले आहे.

# वेलिंग्टन स्कूलमध्ये गुणवंतांचा कौतुक सोहळा



**नांदेड (प्रतिनिधी)–** मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेत वेलिंग्टन स्कूलचा १०० टक्के निकाल लागला आहे. यंदाही विद्यालयाने यशाची परंपरा कायम राखत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. शाळेच्यावतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

या यशाचे श्रेय विद्यार्थ्यांनी शाळेतील नियोजनबद्ध व सातत्यपूर्ण अभ्यास, सराव परीक्षा, प्रश्न निहाय सराव व विषय शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन यामुळे सहज शक्य झाले अशी भावना व्यक्त केली.या परीक्षेत यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा पालकांसह विशेष सत्कार करण्यात आला. दहावी बोर्ड परीक्षेमध्ये शाळेतून कु.श्रुती श्रीराम जाधव ९९.४०%, विद्या गोपाळ पाटील ९२.४०, नीरज आठवले, ऋषिकेश गांजरे...९०, तर सीबीएसई मधून साहिल मारुती दांडे ९२.२०.% गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला. इतर विद्यार्थ्यांनीही प्रथम व द्वितीय श्रेणी मिळविली आहे.

या यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे सल्लागार निळकंठ पावडे, सिंधुताई पावडे, संचालक प्रा. रवींद्र रेड्डी, अध्यक्ष विनोद पावडे, सचिव वर्षा पावडे, प्राचार्य चलपतिराव, मुख्याध्यापक सतीश सिरसाठ, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम

**नांदेड (प्रतिनिधी)–** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती वर्षानिमित्त शनिवार ३१ मे २०२५ रोजी सायं. ५ वा. कुसुम सभागृह, नांदेड येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्यावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. नागरिकांनी या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सांस्कृतिक कार्य विभागाचे संचालक विभीषण चवरे यांनी केले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ३०० व्या जयंतीवर्षा निमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाची संकल्पना सांस्कृतीक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री अॅड.आशिष शेलार यांची असून या कार्यक्रमास मार्गदर्शन मुख्यमंत्र्याचे अपर मुख्य सचिव तथा अपर मुख्य सचिव सांस्कृतिक कार्य विभाग विकास खारगे यांचे लाभले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ह्या केवळ राज्यकर्त्या नव्हत्या तर प्रजाहित दक्ष होत्या. त्यांनी अनेक घाट, मंदिरे जीर्णोद्धार, पाणपोई, धर्मशाळा इ. कामे केली आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ३०० व्या जयंती वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन ३१ मे रोजी नांदेड येथील कुसूम सभागृहात करण्यात आले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ३०० व्या जयंती वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये लोककलाकार आपली कला सादर करणार आहेत. तसेच या सांस्कृतिक कार्यक्रमात विविध लोककलाकारांचा सहभाग राहणार आहे.

# अहिल्यादेवींचे ३०० पुतळे देऊन करणार गुणवंतांचा सन्मान

## त्रिशताब्दी जयंतीनिमित्त बालाजी पेटेकर यांचा उपक्रम

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)–** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सवा निमित्त ३०० व्या जयंतीचे औचित्य साधून ३०० पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यांची भेट देऊन सन्मान करण्यात येणार आहे. सामाजिक कार्य करणारे, गुणवंत विद्यार्थी व विविध स्पर्धेमध्ये प्राविण्य मिळवलेल्या गुणवंतांना पुतळे देऊन सन्मान करणार, अशी माहिती शिल्पकार, चित्रकार असलेल्या बालाजी पेटेकर यांनी दिली आहे.



बालाजी पेटकर यांनी ह्या पुतळ्यांचे मॉडेल बनवले असून सामाजिक सेवेच्या भावनेतून हा उपक्रम त्यांनी हाती घेतला आहे. महाराणी अहिल्यादेवींचा पुतळा समोर ठेवून त्यांचा आदर्श, मानवतावादी दृष्टिकोन, सर्व समाजाप्रती असलेली समाजोनतीची तळमळ, निःस्वार्थ सामाजिक कार्याचा वसा त्यांच्या पुतळ्यातून ही प्रेरणा मिळावी, हा त्यांचा हेतू आहे. अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती वर्षभर महाराष्ट्रासह इतर राज्यातही मोठ्या दिमाखाने हर्ष उल्हासात साजरा करण्यात येत आहे.

या त्रिशताब्दी जन्मोत्सव वर्षानिमित्त विविध ठिकाणी विविध जिल्ह्यात विविध तालुका पातळीवर, वेगवेगळे उपक्रम राबवले जात आहेत.

या सामाजिक उपक्रमातून महामानवांचे विचार प्रत्येकाच्या घराघरात पोहोचावे या उद्देशाने विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. त्यापैकी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य विचारधारा सर्व स्तरापर्यंत जावी म्हणून बालाजी पेटेकर खतगावकर यांनी समाजसेवकांसह ३०० व्या जयंतीनिमित्त ३०० पुतळे देऊन सन्मान करण्याचे ठरवले आहे. त्यांच्या या निःस्वार्थ भावनेतून करण्यात येणाऱ्या समाजपयोगी उपक्रमाचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# ज्येष्ठ नागरिक उ.म.प्रा.वि.फेस्कॉम नांदेडच्या सर्व साधारण महासभेची जय्यत तयारी

**नांदेड (प्रतिनिधी)–** ज्येष्ठ नागरिक उ.म.प्रा.वि.फेस्कॉम नांदेडच्या सर्व साधारण महासभा शनिवार दि. ३१ मे रोजी होणार आहे. या महासभेची जय्यत तयारी करण्यात येत असल्याची माहिती ज्येष्ठ नागरिक संघ उ.म.प्रा वि. फेस्कॉम नांदेडचे अध्यक्ष डॉ.हंसराज वैद्य यांनी दिली आहे.

नवा कौठा गुरूद्वारा डेरा येथे सकाळी ११ वाजता येथे सुरु होणाऱ्या या महासभेला आमदार बालाजीराव कल्याणकर आणि संत बाबा बलविंदर सिंघजी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

डॉ.हंसराज वैद्य व प्रभाकर कुंटूरकर, राजेश जांभळे तथा प्रा. डॉ. राजेश वाघमारे यांनी आमदार बालाजीराव कल्याणकर यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. त्यानंतर ज्येष्ठ नागरिकांच्या मानधनासह प्रलंबित मागण्या संदर्भावरही त्यांच्याशी चर्चा केली. येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीच्या पक्षाच्या निवडणूक जाहिरनाम्यात ज्येष्ठ नागरिकांच्या प्रलंबित न्याय मागण्यांचा अंतर्भाव करण्याचेही आश्वासन आमदार कल्याणकर यांनी डॉ. हंसराज वैद्य यांना दिले.

आता सभेची संपूर्ण तयारी झाली आहे. तेव्हा उ.म. प्रा.वि. फेस्कॉमच्या सर्व कार्य कारणी सदस्यांनी व ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन अध्यक्ष डॉ. हंसराज वैद्य, सचिव प्रभाकर कुंटूरकर व कोषाध्यक्ष गिरिष बाऱ्हाळे तथा समस्त कार्यकारिणीच्यावतीने करण्यात आले आहे.

# युवा

## पावसाळ्यात ट्रिपचा प्लॅन करताय?


**पावसाळ्यात सुंदर निसर्गाचे दर्शन घेण्यासाठी पावले आपोआप घराबाहेर पडतात. तुम्ही यंदा कुठे फिरायला जाण्याचा प्लॅन केला आहे ? जर आतापर्यंत केला नसेल तर हा लेख तुमच्यासाठी. कारण आम्ही तुम्हाला पावसाळ्यात भेट देता येईल अशी महाराष्ट्रातील सुंदर निसर्गरम्य दहा ठिकाणांविषयी सांगणार आहोत.**

- माथेरान : मुंबईजवळ असलेले माथेरान पावसाळ्यात फिरण्यासाठी उत्तम ठिकाण आहे. एक दिवसीय ट्रिपचा तुम्ही प्लॅन करत असाल तर माथेरान हा चांगला पर्याय आहे. येथील टॉय ट्रेनचा प्रवास नक्की करा.
- ताम्हिणी घाट : पुण्यापासून अवघ्या ५० किमीवर असलेले ताम्हिणी घाट पावसाळ्याचा आनंद लुटण्यासाठी उत्तम जागा आहे. दुचाकीने प्रवास करून तुम्ही या ट्रिपची मजा द्विगुणित करू शकता.



- विसापूर किल्ला : विसापूर गावाजवळील हा किल्ला लोणावळ्याजवळ आहे. साहसी ट्रेकचा अनुभव घ्यायचा असेल तर तुम्ही पावसाळ्यात विसापूर किल्ल्याला नक्की भेट द्या.
- देवकुंड धबधबा : रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यात हा सुंदर देवकुंड धबधबा आहे. पावसाळ्यात पर्यटकांसाठी देवकुंड धबधबा आवडतं ठिकाण आहे. या सुंदर धबधब्याला तुम्ही भेट देऊ शकता.
- भोरगिरी : पावसाळ्यात मंत्रमुग्ध करणारी जागा म्हणजे भोरगिरी किल्ला. त्यामुळे या पावसाळ्यात भोरगिरीला अवश्य भेट द्या.
- वरंध घाट : जर तुम्हाला बाइक राइडची आवड असेल तर पावसाळ्यात तुम्ही वरंध घाटला भेट देऊ शकता आणि येथील निसर्गरम्य सौंदर्य अनुभवू शकता.
- महाड : जर तुम्हाला पावसाळ्यात झरे आणि धबधब्यांचा आनंद घ्यायचा असेल तर महाड ही उत्तम जागा आहे. येथे अनेक लहान मोठे धबधबे आहेत आणि विशेष म्हणजे येथे गर्दी खूप कमी असते.
- पानशेत : पावसाळ्यात पानशेत गेला नाही तर तुम्ही काही मिस कराल. पुण्यापासून फक्त एका तासावर असलेले पानशेत पावसाळ्याचा आनंद घ्यायला उत्तम जागा आहे. येथील पानशेत धरण पर्यटकांसाठी खास आकर्षणाचे केंद्रबिंदु आहे.
- माळशेज घाट : मुंबईकरांसाठी ही जागा अत्यंत खास आहे. बाइक राइडचा आनंद घेत तुम्ही पावसाळ्यात या जागेला भेट देऊ शकता.
- खंडी : पुण्यापासून एका तासावर असलेली ही जागा अतिशय सुंदर आणि नयनरम्य आहे. येथे अनेक लहान मोठे धबधबे तुम्हाला पाहायला मिळेल.





# पावसाळी पर्यटनात भलतं साहस नको !

पावसाळी दिवसांमध्ये सह्याद्रीतील डोंगररांगा हिरवाई बहरतात, धुक्यात हरवतात. त्यामुळे भटकंतीचा मोह आवरणे कठीणच. मात्र, या काळातील फिरणे सर्वाधिक जबाबदारीचे व धोकादायक असते. गडकिल्ल्यांवर, धबधब्यांकडे जाणाऱ्या पायवाटा गवताने पुसल्या जातात, चिखलात भिजलेल्या गवताची वाट घसरडी होते. दगडांवर शेवाळे आल्याने आधारासाठी हात ठेवला, तरी अनेकदा तो निसटतो. दाट धुक्यामुळे वाट चुकण्याची सर्वाधिक शक्यता असते. धबधब्यात पोहतानाही पाण्याच्या खोलीचा अंदाज येत नाही. पाय घसरल्यास गंभीर अपघात होऊ शकतो. काही वर्षांत पावसाळी पर्यटनाच्या निमित्ताने भटकंतीला जाणाऱ्यांची संख्या वाढली असतानाच अपघातांची संख्याही काही पटीने वाढली आहे.

### संवेदनशील ठिकाणे

- विसापूर, तिकोना, ढाक-बहिरी, हरिश्चंद्रगड, तोरणा किल्ला, राजगड, अंधारबन, कर्नाळा, सिंहगड, राजमाचीलगतचे जंगल, मुळशी भाग, ताम्हिणी घाट, देवकुंड वॉटर फॉल, महाबळेश्वर डोंगरदऱ्यांचा परिसर, भीमाशंकर अभयारण्य, कोंढवळचा धबधबा, भोरगिरी

### काळजी घेणे आवश्यक

- पावसाळ्यात एकट्याने भटकंती टाळावी
- दरडीचा धोका लक्षात घेऊन कडेकपारींचा अंदाज घेऊन चालावे
- मुक्कामी ट्रेक शक्यतो नको
- धाडसाच्या प्रयत्नात ओढे, नाले ओलांडणे टाळावे
- पाण्याला प्रचंड वेग असल्याने धबधब्यांखाली उभे राहू नये

### भटकंतीला जाताना

- भटकंतीसाठी निवडलेले ठिकाण पावसाळ्यासाठी योग्य आहे का, हे जाणून घ्यावे
- धोकादायक ठिकाणी जाणे कटाक्षाने टाळावे
- माहितगार व्यक्तीशिवाय अपरिचित स्थळी जाऊ नये
- पावसाळी भटकंती, ट्रेकिंग शक्यतो ग्रुपने करावी
- संयोजक अनुभवी- प्रशिक्षित असावा
- पावसापासून संरक्षण देणारे कपडे, चांगल्या दर्जाचे बूट वापरावेत.
- संयोजकांकडे चढाईसाठी आवश्यक साहित्य, प्रथमोपचाराच्या साहित्याची खात्री करावी
- आपत्कालिन परिस्थितीसाठी पोलिस स्टेशन, रुग्णालयांचे संपर्क क्रमांक जवळ ठेवावेत
- कुठेही जाण्यापूर्वी कुटुंबियांना ट्रेकिंगचे पूर्ण नियोजनाची कल्पना द्यावी
- चढाईसाठी लागणारे दोरखंड आणि इतर साहित्य बरोबर ठेवावे

## ओळखा निसर्गाला...

**एखादी अगदी साधी जागा, छोटासा ओढा किंवा प्रवाहसुद्धा काही वेळातच धोकादायक होऊ शकतो. पाण्याच्या प्रवाहाच्या वर डोंगरात पाऊस चालू झाला तर बघता बघता पाण्याचा प्रवाह वाढतो. अनुभवी व्यक्ती बरोबर नसेल तर हा धोका लक्षात न आल्याने मोठा अपघात होतो.**

ओढ्याच्या पाण्याच्या रंगात बदल होणे आणि स्वच्छ पाण्याऐवजी गढूळ पाणी वाहू लागणे, पाण्याबरोबर पालापाचोळा वाहत येणे, स्वच्छ पाण्याची पातळी वाढणे ही काही लक्षणे परिस्थिती धोकादायक होणार याची सूचना देतात. अशा वेळी सुरक्षित ठिकाणी जाणे, इतर कोणी अडकू नये म्हणून त्यांना सूचना देणे आवश्यक असते.

वाहत्या पाण्यात काही खळगे असतात, ते बघून लोक त्यात उड्या मारण्याचा खेळ खेळतात. किल्ल्यांवर पाण्याची दगडात खोदलेली टाकी असतात, हे खळगे आणि पाण्याची टाकी त्यात कपरी असल्यास धोकादायक ठरतात. शिवाय या पाण्याला चांगलाच प्रवाह असतो. असे पाणी आपल्याला बघता बघता वाहून नेऊ शकते. त्यामुळे अशा ठिकाणी खात्री असल्याशिवाय उड्या मारू नयेत. पाण्याची खडकातील टाकी पिण्याच्या पाण्याची सोय म्हणून वापरली जातात. त्यात उतरल्याने हा साठा खराब होतो.

### सुरक्षित पर्यटनासाठी ...

- सहलीला जात असाल तर धबधबे, ओढे अशा ठिकाणी पाण्यात जाऊच नका. दरीकाठी सेल्फी काढणे, रील्स बनवणे टाळा.
- डोंगरातील रस्त्यांवर दरडी कोसळण्याच्या धोका असतो. सावध राहा. निसर्गात मोठ्याने गाणी लावणे, व्यसन करणे आणि बेभान होऊन बेसावध होणे टाळा.
- तुम्ही ट्रेकिंगला जात असला तर एखाद्या अनुभवी ग्रुपबरोबर जा. त्यांची सरकारी नियमानुसार नोंदणी झाली आहे का, याची प्रमाणपत्र बघून खात्री करा. त्यांच्याबरोबर प्रथमोपचार आणि सुरक्षा साहित्य आहे का, याची खात्री करा.
- ग्रुपऐवजी स्वतःच जात असाल तर एखादा गावकरी बरोबर घ्या. त्याने दिलेल्या सुरक्षा सूचनेचे पालन करा. अनोळखी पाण्यात उतरू नका, ट्रेकला किती चालावे लागेल, याचा नीट अंदाज घ्या आणि वेळेत परत या. कुठल्याही अनुभवी ट्रेकरचे फोन नंबर, प्रथमोपचार पेटी आणि दोर सोबत ठेवा.



## भारतातील ६ पावसाळी ठिकाणं परफेक्ट!

**यंदा तुम्ही मित्र- मैत्रिणींसोबत एखाद्या सुंदर ठिकाणी ट्रिपला जाण्याचा प्लॅन करत असाल तर भारतातील काही परफेक्ट सुंदर अशी ठिकाणं तुम्हाला सांगणार आहोत. ज्याठिकाणी मित्र-मैत्रिणींसोबत जाऊन तुम्ही सुंदर आठवणी बनवू शकता. ज्या तुम्हाला आयुष्यभर आठवणीत राहतील, चला तर मग जाणून घेऊ अशा ठिकाणांबद्दल...**

- गोकर्ण : कर्नाटकातील गोकर्ण हे सुंदर पर्वत रांगांनी वेढलेले एक पर्यटन स्थळ आहे. याठिकाणचे अथांग पसरलेले स्वच्छ समुद्र किनारे पाहून तुमचे हृदय हरवून जाईल. मित्र-मैत्रिणींसोबत बीच पार्टी करण्यासाठी हे ठिकाण तुमच्यासाठी सर्वोत्तम पर्याय असू शकते. येथील समुद्र किनाऱ्यावरील दृश्य गोव्यापेक्षा कमी नाही.
- कुर्ग : बॅचलर पार्टीसाठी कर्नाटकातील कुर्ग हे एक सुंदर ठिकाण आहे, इथल्या हिरवाईपासून ते धबधबे आणि कॉफीच्या सुंदर मळे पाहून तुम्हीही भारावून जाल. याशिवाय तुम्ही येथे घोडेस्वारी आणि ट्रेकिंगचाही आनंद घेऊ शकता.
- मुन्नार : पावसाळ्यात मित्र-मैत्रिणींसह फिरण्यासाठी केरळमधील स्वर्ग मानले जाणारे मुन्नार हे ठिकाणं एकदम परफेक्ट आहे. पावसाळ्यात येथील निसर्ग सौंदर्य अगदी खुलून येते. चारही बाजूने पसरलेली हिरवळ, छोटे- छोटे वाहणारे झरे हे वातावरण आल्हाददायी असते. तुम्ही जर निसर्गप्रेमी असाल तर मुन्नारमधील इको, पॉइंट, एरविकुलम नॅशनल पार्क आणि कुंडला तलावाला नक्की भेट द्या.
- दार्जिलिंग : जर तुम्हाला मित्र-मैत्रिणींसोबत ट्रिपला जायचे असेल तर तुमच्यासाठी दार्जिलिंग हे एक उत्तम ठिकाण आहे. इथल्या चहाच्या मळ्यांचे सौंदर्य पावसाळ्यात आणखीनच वाढते. हे ठिकाण केवळ प्रेक्षणीय स्थळांसाठी सर्वोत्तम नाही तर तुम्ही येथे निवांत क्षणही घालवू शकता. इथली टॉय ट्रेन तुमच्या सहलीची मजा द्विगुणित करेल.
- शोजा : हिमाचल प्रदेशमधील शोजा नावाचे एक छोटे गाव आहे. चारही बाजूंनी डोंगर, दऱ्या असल्याने याच्या सौंदर्यात आणखी भर पडते. मित्र मैत्रिणींसोबत पावसाळ्यात फिरण्याचा प्लॅन असेल तर हे बेस्ट प्लेस आहे. इथले वॉटरफॉल पॉइंट पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्रबिंदू आहेत. इथे गेल्यानंतर तुम्हाला निसर्गाच्या कुशीत असल्याचा भास होईल.

## पावसाळ्यात 'या' पाच ठिकाणी चुकूनही जाऊ नका

**पावसाळ्यात अनेकजण कुठेतरी मस्त निसर्गरम्य ठिकाणी जाण्याचा विचार करतात. यावेळी भारतातील अनेक राज्यातील निसर्ग सौंदर्याने नटलेली पर्यटन स्थळे डोळ्यासमोर येतात. पण या ऋतूत तुम्हीही कुठेतरी फिरण्याचा विचार करत असाल तर आम्ही तुम्हाला अशाकाही ५ ठिकाणांबद्दल सांगणार आहोत जिथे पावसाळ्यात जाणे टाळले पाहिजे...**

- उत्तराखंड : उत्तराखंड हे भारतातील एक लोकप्रिय पर्यटनस्थळ आहे. देश-परदेशांतील पर्यटक या ठिकाणी भेट देण्यासाठी येतात. मसुरी, नैनिताल व हृषिकेश यांसारख्या हिल स्टेशन्ससह येथे भेट देण्यासारखी अनेक चांगली ठिकाणे आहेत. पण, पावसाळ्यात या ठिकाणी मुसळधार पाऊस पडत असल्याने तिथे दरड कोसळण्याची समस्या कायम असते. अशा परिस्थितीत पावसाळ्यात येथे पर्यटनासाठी जाणे कठीण आणि धोकादायक ठरू शकते.
- लडाख : नैसर्गिक सौंदर्याने नटलेले लडाख हे केवळ आपल्या देशातच नाही, तर परदेशांतही प्रसिद्ध आहे. येथील सौंदर्य पाहण्यासाठी दरवर्षी लाखो लोक या ठिकाणी येत असतात. मात्र, पावसाळ्यात लडाखला न येण्याचा सल्ला दिला जातो. कारण- पावसामुळे लेह-मनाली महामार्ग व लेह-श्रीनगर महामार्ग यांसारख्या लडाखकडे जाणाऱ्या रस्त्यांवर भूस्खलनाचा धोका असतो. अशा परिस्थितीत येथील रस्ते तात्पुरते बंद केले जातात.
- हिमाचल प्रदेश : हिमाचल प्रदेशातील शिमला, मनाली व धरमशाला यांसारख्या लोकप्रिय पर्यटनस्थळांवर पावसाळ्यात मुसळधार पावसामुळे दरडी कोसळणे आणि रस्ते बंद होण्यासारख्या समस्या निर्माण होतात. अशा परिस्थितीत हिमाचलमध्ये पर्यटनासाठी जाणे आव्हानात्मक ठरू शकते.
- गोवा : गोवा हे पर्यटनासाठी जगभरातील लोकप्रिय ठिकाण आहे. या ठिकाणी अनेक प्रसिद्ध बीचेस आहेत. परंतु, पावसाळ्यात येथे मुसळधार पाऊस असतो आणि या काळात समुद्रकिनाऱ्याची पातळीही खूप वाढते. अशा स्थितीत पावसाळ्यात वॉटर रायडिंगच्या अनेक ॲक्टिव्हिटी बंद असतात. त्यामुळे पावसाळ्यात गोव्याला जाण्याचा प्लॅन चुकूनही बनवू नका.
- अंदमान आणि निकोबार : अंदमान आणि निकोबार या बेटांवर पावसाळ्यात जोरदार पाऊस आणि वारे वाहतात. अशा स्थितीत येथील वाहतूक व जलवाहतुकीत मोठी अडचण होते. त्यामुळे तुम्हीही येत्या काही दिवसांत या बेटांना भेट देण्याचा विचार करत असाल, तर तूर्तास तो बेत सोडून द्या.

## चेहऱ्यावर, दाढीत दडलंय कोण?

**दाढी राखलेला रफ-टफ लूक पुरुषांमध्ये खूप ट्रेंडिंग आहे. एकेकाळी क्लीन-शेव्हन चॉकलेट बॉय लूक खूप लोकप्रिय होता. परंतु आता बहुतांश पुरुष दाढी वाढवत असतात. ते वेगवेगळ्या स्टाईलने दाढी सेट करतात. पण दाढीच्या देखभालीसोबतच तिची स्वच्छतासुद्धा खूप महत्त्वाची आहे. जेव्हा तुमची दाढी तुमच्या आरोग्याची शत्रू बनते तेव्हा काय होतं याची कल्पना करा.**

- दाढी बॅक्टेरियांचं माहेरघर : तुमच्या लूकमध्ये भर घालणारी दाढी बॅक्टेरियांचं माहेरघर बनते आणि याकडे बहुतेक पुरुष लक्षच देत नाहीत. या अशा दुर्लक्ष करण्याने तुम्ही जाणूनबुजून किंवा नकळत रोगांना आमंत्रण देत आहात, ही गोष्ट लक्षात घ्या. तुम्हीही अशा लोकांपैकी असाल ज्यांना दाट दाढी ठेवायला आवडते, तर बॅक्टेरिया तुम्हाला कसे आजारी पाडू शकतात आणि तसं होऊ नये म्हणून कोणत्या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत हे जाणून घ्या.
- त्वचेवर घाण साचल्याने बॅक्टेरिया वाढतात : कामानिमित्त बाहेर जाणं, धूळ आणि प्रदूषणाच्या संपर्कात येणं अशी अनेक कारणं आहेत, ज्यामुळे त्वचेवर घाण साचते. बॅक्टेरियादेखील वाढतात. दिवसातून दोन ते तीन वेळा चेहरा धुण्याचा सल्ला दिला जातो. पण असं असूनही तुमची दाढी बॅक्टेरियांचं प्रजनन केंद्र बनू शकतं आणि तुम्ही आजारी पडू शकता.
- टॉयलेट सीटइतके दाढीत बॅक्टेरिया : न्यूयॉर्कच्या वेल कॉर्नेल मेडिसिन स्कूलमधील प्राध्यापक डॉ.शारी लिपनर म्हणतात की, त्वचेवर बॅक्टेरिया असणं ही सामान्य बाब आहे आणि दाढीमध्येही बॅक्टेरिया वाढतात. जर दाढीच्या स्वच्छतेची नीट काळजी घेतली नाही तर मात्र अनेक आजार होऊ शकतात. काही महिन्यांपूर्वी झालेल्या एका अभ्यासादरम्यान, १८ ते ७६ वयोगटातील पुरुषांच्या दाढीचे नमुने घेण्यात आले. निष्कर्षांत असं आढळून आलं की काही पुरुषांच्या दाढीमध्ये टॉयलेट सीटइतके बॅक्टेरिया असू शकतात.
- आरोग्य कर्मचाऱ्यांच्या दाढीमध्ये जास्त बॅक्टेरिया : रुग्णालयात काम करणाऱ्या लोकांच्या दाढीमध्ये बॅक्टेरिया असण्याची शक्यता जास्त असते. अभ्यासातून असं दिसून आलं आहे की मास्क घातलेला असूनही, आरोग्य कर्मचाऱ्यांच्या दाढीमध्ये जास्त बॅक्टेरिया असतात, त्यामुळे मास्कला वारंवार हात लावू नये याची विशेष काळजी घ्या.



### काय काळजी घ्याल...

तुम्ही दाढी आणि मिशा ठेवत असाल तर स्वच्छतेची विशेष काळजी घ्या. पावसाळ्यात बॅक्टेरियाची शक्यता आणखी वाढते, म्हणून घाम आल्यावर आणि पावसात भिजल्यावर दाढी लगेच वाळवा. तुम्ही तेलकट किंवा मसालेदार अन्न खाल्लं असेल किंवा व्यायाम केला असेल तर त्यानंतरही तुम्ही शेव्ह स्वच्छ करणं खूप महत्वाचं आहे. यासाठी फेस क्लींजर वापरा. त्याच वेळी चेहऱ्यावर कुठेतरी काप किंवा मुरुमांचा घाव असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. तुमच्या दाढी आणि मिशांना वारंवार स्पर्श करणं टाळा.

# सर्व विभागांच्या समन्वयातून 'आषाढी वारी' यशस्वी करा -मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई (प्रतिनिधी)-** पंढरपुरची 'आषाढी वारी' पूर्वापार चालत आलेली परंपरा आहे. वारकरी आणि वारी राज्याचे वैभव वाढविणारी आहे. यावर्षी पावसाचे आगमन लवकर झाले असून या पार्श्वभूमीवर सर्व मानाच्या पालख्यांना आणि वारकऱ्यांसाठी पाणी, आरोग्य सुविधा, फिरती शौचालये आणि पोलीस बंदोबस्तासाठी सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांनी योग्य नियोजन करावे. ही वारी यशस्वी करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने प्रयत्न करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.



सह्याद्री अतिथीगृह येथे आषाढी एकादशी वारीच्या अनुषंगाने पूर्वतयारी आढावा बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. बैठकीला उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, ग्रामविकास मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह वित्त, नियोजन, सार्वजनिक बांधकाम, नगरविकास, आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी, मानाच्या १० दिंड्यांचे प्रमुख प्रतिनिधी उपस्थित होते.

पुणे शहराच्या ठिकाणी विविध स्वागत मंडप, लाऊड स्पीकरवर बंदी, प्रत्येक पालख्यांना जास्तीचा पोलीस बंदोबस्त, अरूंद रस्त्यांचे रूंदीकरण, वाखरी मॉडेल वारकरी तळ, पालखीसोबत साध्या म्ब्युलन्ससोबत कार्डियाक म्ब्युलन्स, दर्शन पासची संख्या, वॉटर प्रूफ टेंट, पाण्याचे टँकर, मुबलक औषध साठा, पालख्यांच्या पारंपरिक मार्गाचा विकास, फिरती शौचालये, याबाबत सूचना मांडण्यात आल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, वारीचे योग्य नियोजन करण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्नशील आहे. पुणे, पिंपरी चिंचवड आयुक्तांनी पालख्यांच्या स्वागतासाठी वेगळी व्यवस्था करावी. रस्त्याच्या बाजूला मंडप टाकून स्वागत करावे, मात्र पालख्यांना विलंब होवू नये, याची दक्षता घ्यावी. वारीच्या यशस्वी नियोजनासाठी आपत्ती व्यवस्थापनाने दक्ष राहावे.

पंढरपूर येथील वारीमध्ये दरवर्षी १५ ते २० लाख वारकरी सहभागी होतात. पंढरपूर दिंडीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांचे आजारपण, अपघात किंवा मृत्यू झाल्यास या संदर्भात संबंधितांना दिलासा देण्यासाठी शासनाने मागील वर्षी 'विठ्ठल रखुमाई वारकरी विमा छत्र योजना' सुरु करण्याचा निर्णय घेतला. यावर्षीही वारीमध्ये सामील होणाऱ्या वारकऱ्यांना समूह विमा राहणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. मानाच्या पालखीमधील वारकऱ्यांना यापुढे दर्शन पास योग्य प्रमाणात वाढवून दिले जातील, असेही त्यांनी सांगितले.

# कर्जबाजारीपणाला कंटाळून एकाच कुटुंबातील सात जणांची आत्महत्या

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)-** हरियाणाच्या पंचकुला येथे एकात कुटुंबातील सात सदस्यांनी आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच समोर आला होता. प्रवीण मित्तल हे भंगार व्यावसायिक होते. मात्र, गेल्या काही वर्षांमध्ये त्यांच्या डोक्यावर प्रचंड कर्ज झाले होते. कर्जाचा हा आकडा २० कोटी रुपयांच्या घरात होता. या कर्जाच्या वसुलीसाठी बँकेने त्यांचा कारखाना, घर आणि अन्य मालमत्ता जप्त केल्या होत्या. त्यामुळे प्रवीण मित्तल आणि त्यांचे कुटुंब भाड्याच्या घरात राहत होते. गरिबीमुळे प्रवीण मित्तल यांच्यावर कॅब चालवायची वेळ ओढावली होती. या सगळ्यामुळे प्रवीण मित्तल यांनी आपल्या कुटुंबासह आत्महत्या करण्याचा निर्णय घेतला होता.

प्रवीण मित्तल आणि त्यांचे कुटुंब सोमवारी बागेश्वर धामच्या धीरेंद्र शास्त्री महाराजांच्या सत्संगला गेले होते. तिथून परत येताना पंचकुला येथील सेक्टर २७ मध्ये कार थांबवून कुटुंबातील सगळ्यांनी सामूहिक आत्महत्या केली. त्यांच्या कारमध्ये दोन पानांची एक चिठ्ठी सापडली आहे. त्यामध्ये आपले कुटुंब कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या करत असल्याचे नमूद करण्यात आले होते.

प्रवीण मित्तल यांची पत्नी, त्यांचे आई-वडील आणि तीन लहान मुलांनी विष पिऊन आत्महत्या केली. विष प्यायल्यानंतर सगळ्यांचा जीव गेला. मात्र, प्रवीण मित्तल हे रुग्णालयात नेईपर्यंत जिवंत होते. ते गाडीच्या बाहेर येऊन बसले होते. सेक्टर २७ मधील नागरिकांनी या कारमधून टॉवेल बाहेर लटकत होता. ही गोष्ट तिथून जाणाऱ्या पुनीत राणा नावाच्या व्यक्तीला खटकली. पुनीत राणा आणि त्यांचा भाऊ दोघे कारपर्यंत चालत गेले आणि त्यांनी अंत्यवस्थ अवस्थेत फुटपाथवर बसलेल्या प्रवीण मित्तल यांच्याकडे विचारणा केली. त्यावेळी त्यांनी आपण कुटुंबासह बागेश्वर धामहून परत आलो आहोत, आम्हाला हॉटेल न मिळाल्यामुळे कार रस्त्यात थांबवून झोपण्याचे ठरवले, असे त्यांनी राणा यांना सांगितले. तेव्हा राणा यांनी त्यांना कार मार्केट परिसरात नेण्यास सांगितली. तेव्हा प्रवीण मित्तल जागेवरुन उठले. मात्र, विष प्यायल्याने त्यांची प्रकृती ठीक नसल्याने त्यांच्या हालचाली पाहून राणा यांना संशय आला आणि त्यांनी कारचा दरवाजा उघडताच आतमध्ये असलेले मृतदेह त्यांच्या नजरेस पडले. प्रवीण मित्तल यांनी कार दुसरीकडे नेण्यासाठी दरवाजा उघडला तेव्हा पुनीत राणा यांनी आतमध्ये डोकावून पाहिले. त्यावेळी पुनीत राणा यांच्या नजरेस भयावह दृश्य दिसले.

कारमध्ये सहा मृतदेह होते. कारचा दरवाजा उघडताच प्रचंड दुर्गंधी आली. कारमधील सहाजण खाली पडले होते. त्यांनी एकमेकांच्या अंगावर उलट्या केल्या होत्या. त्यामुळे कारमध्ये प्रचंड दुर्गंधी पसरली होती. हे पाहून राणांनी प्रवीण मित्तल यांना कारच्या बाहेर खेचून या प्रकाराबद्दल विचारले. तेव्हा प्रवीण मित्तल यांनी सांगितले की, आमच्या कुटुंबाने आत्महत्या केली आहे. मी देखील आता पाच मिनिटांत मरणार आहे. आमच्यावर खूप मोठं कर्ज आहे. आमचे नातेवाईक श्रीमंत आहेत, पण त्यांनी आम्हाला मदत केली नाही, असे प्रवीण मित्तल यांनी म्हटले.

# राजधानीत महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)-** शूर योद्धा, महापराक्रमी महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र सदन व महाराष्ट्र परिचय केंद्रात त्यांना अभिवादन करण्यात आले.



कॉपर्निकस मार्गस्थित महाराष्ट्र सदनातील सभागृहात आयोजित कार्यक्रमात निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांनी महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी सहायक निवासी आयुक्त डॉ. राजेश अडपावार, श्रीमती स्मिता शेलार यांच्यासह उपस्थित महाराष्ट्र सदनाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

महाराष्ट्र परिचय केंद्रात आयोजित कार्यक्रमात महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. परिचय केंद्राच्या उपसंचालक अमरज्योत कौर अरोरा यांच्यासह उपस्थित कर्मचाऱ्यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंतीनिमित्त कौशल्य विकास, रोजगार मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

# एनडीएत पहिल्यांदा १७ महिला कॅडेटस् पासआऊट; आजच्या परेडमध्ये नारीशक्ती दिसणार

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)-** नॅशनल डिफेन्स अकादमी अर्थात एनडीएची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर भारतीय लष्करात अधिकारी म्हणून प्रवेश करता येतो. यंदा १४८ व्या कोर्सच्या महिला कॅडेटस्चा पहिली बॅच त्रिसेवा अकादमीत पासआऊट होणार आहे. ३० मे रोजी त्यांची पासिंग आऊट परेड होणार आहे. असे पहिल्यांदा होणार आहे की ३०० हून पुरुष कॅडेटस्सह १७ महिला कॅडेट्स एनडीएतून ग्रॅज्युएट होणार आहेत. या सर्व महिला कॅडेटस् भारतीय लष्कर, वायू सेना किंवा नौदलात दाखल होऊ शकतात.

'एनडीए'च्या ऐतिहासिक १४८ व्या कोर्सच्या दीक्षांत समारंभात आणि पासिंग आऊट परेडच्या आधी एनडीएत महिला कॅडेटस्च्या पहिल्या बॅचच्या काही कॅडेटस्ने गेल्या शुक्रवारी देशाच्या प्रमुख त्रिसेवा अकादमीत आपल्या तीन वर्षांच्या प्रवासाबद्दल मोकळेपणे सांगितले. यापैकी एक कॅडेटस् इशिता शर्मा यांनी सांगितले की आम्हाला नेहमी समान संधी दिली गेली. आणि आमची जेंडर कधी आड आले नाही. सर्व महिला कॅडेटस्मध्ये एकतेचे भावना पाहायला मिळाली. आम्ही एकमेकांच्या साथी दिल्याचे त्यांनी सांगितले.

डिव्हीजन कॅडेटस् कॅप्टन इशिता शर्मा 'एनडीए'त येण्याआधी दिल्ली युनिव्हर्सिटीत इकॉनॉमिक्स मध्ये ऑनर्स करीत होती. माझ्या मते 'एनडीए'त महिलांनाचे सामील होणे आणि पहिल्या बॅचचे पास होणे महिला आणि महिला सशक्तीकरणासाठी खूप महत्वाचे आहे.जेव्हा महिलांना नेतृत्व करताना पाहीले जाते. तेव्हा त्यांना स्थायी कमिशन मिळते. यातून युवा महिलांना एनडीएत आणि सशस्त्रदलात सामील होण्याची इच्छा निर्माण होते. या वेळी एक अन्य कॅडेटस् रितुल यांनी आपले अनुभव सांगताना सांगितले की, मी माझ्यासाठी शारीरिक सहनशक्तीला जबाबदार मानेल. या तीन वर्षांत हळू-हळू ट्रेनिंगसह आम्हा सर्वात सुधारणा झाली. अनेक लोक दोन किलोमीटरही धावले नव्हते. प्रशिक्षणानंतर आम्ही लागोपाठ १४ किलोमीटर धावू लागलो. त्यातून आम्हाला भाविनिकदृष्ट्या फ्लेक्सिबल बनण्यात देखील मदत मिळाली असेही रितुल यावेळी म्हणाल्या.ऑगस्ट २०२१ मध्ये सुप्रीम कोर्टाने एक ऐतिहासिक निकाल दिला होता आणि महिलांना 'एनडीए' परीक्षेत सामील होण्यास परवानगी देण्याचा आदेश युपीएससीला दिला होता. सर्वोच्च न्यायालयात पात्र महिलांना युपीएससीद्वारे आयोजित 'एनडीए' आणि नौदल एकादमीच्या प्रवेश परीक्षांना बसण्याची परवानगी द्यावी अशी याचिका दाखल करण्यात आली होती.

# शिक्षण उपसंचालकांना छत्रपती संभाजीनगरमधून अटक

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)-** राज्यभरात गाजत असलेल्या नागपूर जिल्ह्यातील बोगस शालार्थ आयडी आणि बोगस शिक्षक भरती घोटाळा प्रकरणी नवी माहिती समोर आली आहे. या प्रकरणी आता छत्रपती संभाजीनगर येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळाच्या सचिव वैशाली जामदार यांना अटक करण्यात आली आहे.

नागपूर पोलिसांच्या एसआयटीने छत्रपती संभाजीनगर इथून त्याना ही अटक करण्यात आली असून त्यांना नागपुरात आणण्यात आले आहे. त्यामुळे आता या प्रकरणाची व्याप्ती दिवसागणिक वाढत असल्याचे बोललं जात आहे.

छत्रपती संभाजीनगर येथे विभागीय शिक्षण मंडळ सचिव पदावर कार्यरत असलेल्या वैशाली जामदार या उल्हास नरड यांच्या पूर्वी नागपूर विभागीय शिक्षण उपसंचालक होत्या. तपासा दरम्यान त्यांच्या कार्यकाळात नागपूर शिक्षण उपसंचालक कार्यालयाव्दारे बनावट कागदपत्राचे आधारे अपात्र शिक्षकांना पदोन्नती देण्यास मान्यता देण्याचा ठराव करण्यात आला आणि फेरबदल करुन शासनाची फसवणूक करण्यात आल्याचे निदर्शनास आले. यावरून या घोटाळा प्रकरणी नियुक्त विशेष तपास पथकाने त्यांना हजर राहण्याची नोटीस दिली होती.

# ट्रॅव्हल्स-बसचा भीषण अपघात; दोघांचा जागीच मृत्यू; ३४ जण जखमी

**लातुर (प्रतिनिधी)-** लातूरमध्ये दोन प्रवासी बसला भीषण अपघात झाल्याची घटना समोर आली आहे. दोन खासगी बसची धडक होऊन झालेल्या अपघातामध्ये दोघांचा जागीच मृत्यू झाला. पुण्याहून उदगीरकडे जाणाऱ्या कृष्णा व अभिनव ट्रॅव्हल्सचा गुरूवारी पहाटे ५ वाजता उदगीरकडे जात असताना औसा तालुक्यातील उजनी पासून एक किलो मिटर अंतरावर अपघात झाला. या घटनेत दोन जण ठार तर ३४ जण जखमी आहे. त्यात ८ जणांची प्रकृती गंभीर आहे.




तुळजापूर ते लातूर महामार्गावर उजनी नजीक गुरुवारी पहाटे एकता बियर बार जवळ उदगीरकडे निघालेल्या कृष्णा ट्रॅव्हल्स क्रमांक ठ ०१ ध ३५५५ या गाडीला पाठीमागून आलेली अभिनव ट्रॅव्हल्स चक २४ थ १२१२ या गाडीने जोराची धडक दिली. यात कृष्णा ट्रॅव्हल्सची बस जागीच पलटी होऊन त्यात ३४ प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. तर अभिनव ट्रॅव्हल्सचा क्लिनर नामदेव व्यंकटराव सूर्यवंशी (वय ४०, रा अळवाई. ता भालकी. जि बीदर) हा जागीच ठार झाला.

या घटनेची माहिती मिळताच लातूर येथील पोलीस महामार्गचे पथक सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय भोसले, योगीराज नागरगोजे व भादा पोलिस निरीक्षक महावीर जाधव, रतन मोरे, अनंत कांबळे, माऊली फड, अनंत शिंदे यांनी धाव घेतली. तसेच उजनी येथील हॉटेल चालक व कामगारांना मदतीसाठी बोलवण्यात आले. मयत नामदेव व्यंकटराव सूर्यवंशी यांचे पार्थिव उजनी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदनासाठी ठेवण्यात आले आहे.

# अंगणवाडी केंद्रांना प्रोत्साहन भत्ता देणार -ना.आदिती तटकरे

**मुंबई (प्रतिनिधी)-** एकात्मिक बालविकास सेवा योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून बालकांमधील कुपोषणाचे प्रमाण कमी करणे, पूर्व शालेय शिक्षणाचा दर्जा सुधारणे यासाठी विविध निकषांवर अंगणवाडीचे गुणात्मक मूल्यमापन करण्यात येणार आहे. याचबरोबर गुणांकनानुसार प्रोत्साहन भत्ता देण्यात येणार असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

मंत्रालयात एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेल्या प्रोत्साहन भत्ताच्या निकषांमध्ये सुधारणा करणेबाबत तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार वितरणाबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सचिव डॉ. अनुपकुमार यादव, सह सचिव वी. रा. ठाकूर, एकात्मिक बाल विकास विभागाच्या उपायुक्त श्रीमती संगीता लोंढे, विभागाचे उपायुक्त राहुल मोरे, उपसचिव प्रसाद कुलकर्णी आदींसह अधिकारी उपस्थित होते. मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी एकत्रित केलेल्या कामाच्या निकषानुसार प्रोत्साहन भत्ता दिला देण्याकरिता अंगणवाडी केंद्राकरिता निकष ठरविण्यात येणार आहेत. अंगणवाडी केंद्राने १० पैकी ७ निकष पूर्ण केल्यास १४०० रुपये, ६ निकष पूर्ण केल्यास १६०० रुपये, ९ निकष पूर्ण केल्यास १८०० रुपये व १० निकष पूर्ण केल्यास २००० याप्रमाणे प्रोत्साहन भत्ता देण्यात येणार आहे. अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना सेवा निवृत्ती नंतर किंवा मृत्यू झाल्यास कुटुंबियांना ग्रॅच्युइटी (एकरकमी आर्थिक सहाय्य) देण्या संदर्भात प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मंत्री तटकरे यांनी दिले.

# अतिक्रमणप्रकरणी दोषींवर गुन्हे दाखल करावे -महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई (प्रतिनिधी)-** विधान मंडळ अधिवेशनादरम्यान लक्षवेधीवरील माहिती नुसार पुणे शहरातील कात्रज, कोंढवा, येवलेवाडी या तीन ठिकाणांच्या अतिक्रमण प्रकरणी दोषींवर गुन्हे दाखल करावेत, यासाठी पुणे महानगरपालिका व महसूल विभागातील संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने कारवाई करावी, असे आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.



मंत्रालयात लक्षवेधीवरील कार्यवाहीच्या अनुषंगाने मंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला आमदार योगेश टिळेकर तसेच पुणे महानगरपालिकेचे व पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. मंत्रालयात सहसचिव सत्यनारायण बजाज, सहसचिव अजित देशमुख उपस्थित होते.

महसूल मंत्री श्री बावनकुळे म्हणाले, विधिमंडळ अधिवेशनातील लक्षवेधीवरील सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची लवकरच प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करणार आहे.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली महसूल विभागाशी संबंधित विविध विषयांवरील बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. या संबंधित बैठकांना राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल, आमदार प्रकाश सोळंके, आमदार प्रवीण दरेकर, अतिरिक्त मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, सहसचिव अजित देशमुख उपस्थित होते. भूमि अभिलेख संचालक डॉ. सुहास दिवसे दूरदृष्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते. बैठकींमध्ये मोबाईल टॉवर साठीच्या जागांचे भाडेपट्टा करारातील नोंदणीच्या अडचणीबाबत चर्चा झाली. परतवाडा जि. अमरावती नगरपरिषद हद्दीतील जमिनीस वाणिज्यिक वापरासाठी परवानगीबाबत या बैठकीत चर्चा करण्यात आली.

# पासपोर्ट कार्यालयात धाड; लाच घेताना अधिकाऱ्यासह दलालास अटक

**मुंबई (प्रतिनिधी)-** राज्यात 'एसीबी'ने भ्रष्टाचारविरोधी मोहिम हाती घेत लाच घेणाऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. दोन दिवसांपूर्वीच छत्रपती संभाजीनगरमध्ये थेट निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली असून ५ लाखांची लाच स्वीकारताना अटक केली. तर, रत्नागिरी जिल्ह्यातही महसूल विभागातील तीन जणांना लाच घेताना रंगेहात अटक करुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एकीकडे राज्यात 'एसीबी'ने लाचखोर अधिकाऱ्यांवर धडक कारवाई सुरू केली असताना दुसरीकडे 'सीबीआय'ने देखील केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांविरुद्ध प्रतिबंधक कारवाई सुरू केल्याचं पाहायला मिळत आहे. मुंबईतील लोअर परळ येथील पासपोर्ट कार्यालयातील एका अधिकाऱ्यास लाच घेताना रंगेहात अटक करत सीबीआने लाचखोरांना दणका दिला आहे.

केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) लोअर परळ येथील पारपत्र सेवा केंद्र म्हणजेच पासपोर्ट कार्यालयातील कार्यालय सहाय्यक आणि एका दलालाला भष्टाचार प्रतिबंधक कायद्या अंतर्गत अटक केली. त्यांच्यावर बनावट कागदपत्रांवर आधारित पारपत्र (पासपोर्ट) काढून देण्यासाठी लाच घेतल्याचा आरोप आहे. आरोपींनी अनेक पारपत्र बनावट कागदपत्रांच्या आधारे बनवल्याचा आरोप आहे. तसेच, ७ बनावट पारपत्र अर्ज सीबीआयला सापडले आहेत. सध्या त्यांची पडताळणी सुरू आहे. कनिष्ठ पारपत्र सहाय्यक अक्षय कुमार मीणा व दलाल भावेश शांतीलाल शहा अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

मीणा हे कनिष्ठ पारपत्र सहाय्यक असून लोअर परळ येथील पारपत्र सहाय्यक केंद्रावर पडताळणी अधिकारी होते. 'सीबीआय'ने या दोघांविरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. तक्रारीनुसार, २०२३-२४ या काळात संबंधित मीणा व खासगी दलला शहा यांनी संगनमत करून कट रचला होता.

## जाहीर नोटीस

कारणे जाहीर प्रगटन देण्यात येते की, माझे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून सर्व जनतेस व संबंधीतास सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार श्री. मधुकरराव पि. कृष्णाराव बापट, रा. गांधीनगर, धर्माबाद, ता. धर्माबाद, जि. नांदेड येथील रहिवाशी असुन जेष्ठ नागरीक आहे. तसेच माझ्या पक्षकाराच्या हक्कात पक्षकाराची वडिलोपार्जीत व स्थावर मालमत्ता ही धर्माबाद येथील गावठाण मध्ये मिळकत क्र. ३-४४६, ३-४४७, ३-३४५ व ३-४४४ अशी आहे. ती मालमत्ता माझ्या पक्षकारास न बदलणारे सर्व साधारण अधिकारपत्राआधारे मिळालेली आहे व त्या मालमत्तेचा नगरपालिका धर्माबाद कडे आजपर्यंत कर भरलेला आहे. १) हे की, त्या मालमत्तेपैकी घर/ वार्ड क्रमांक ३ धर्माबाद मधील घर क्र. ४४३ हे लक्ष्मीबाई नारायण बापट हिने सन २००५ मध्ये दुय्यम निबंधक कार्यालय वर्ग-१ बिलोली येथे रजिस्ट्रीद्वारे कायदेशीररित्या विक्री केले असून खरेदीदारास त्या घराचा प्रत्यक्ष ताबा करून दिलेला आहे. त्या बाबत वाद नाही. त्या घराच्या चतुर्थ, सिमा येणे प्रमाणे: पुर्वेस- साडे सहा फुटाची बोळ आहे व सुरकुटवार यांचे घर आहे, पश्चिमेस- मधुकरराव कुलकर्णी यांची मोकळी जागा, दक्षिणेस- लक्ष्मीबाई नारायणराव बापट यांचे टिनचे घर आहे, उत्तरेस- नगरपालिकेचा सार्वजनिक रोड (बाळापूरची पांदन वाट) आहे.

२) हे की, मालमत्ता क्र. ३-४४४ व ३-४४५ ही मालमत्ता माझे पक्षकार हा त्याचे उदरनिर्वाहसाठी कायदेशीररित्या विक्री करणार आहे जर ह्या मालमत्ते बाबत त्या कोणाकडे कायदेशीररित्या कागदपत्रे असतील किंवा कांही हीत संबंध असतील तर त्यानी त्या कागदपत्रासह १० दिवसाचे आत तसा माझ्या पक्षकाराकडे किंवा त्याचे वकिलाकडे आक्षेप नोंदवावा किंवा माझे पक्षकाराने कोणाकडून मालमत्ता क्र. ३-४४४ ३-४४५ बाबत कांही रक्कम घेतली असेल तर माझे पक्षकार हा नियमाप्रमाणे / ठरल्याप्रमाणे रक्कम परत करण्यास तयार आहे. तरी ह्या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते आहे जर १० दिवसाचे आत कोणीही कागदपत्रासह माझे पक्षकाराकडे किंवा त्यांचे वकिलाकडे आक्षेप नोंदवला नाही तर माझे पक्षकार ही ती मालमत्ता क्र३-४४४,३-४४५ ही कायदेशीर रित्या विक्रीखताआधारे कोणासही विक्री करील व १० दिवसानंतर घेतलेला आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही.

करिता हे जाहीर प्रगटन.

**मार्फत**
**ॲड.सावळे.एस.एम**
**जिल्हा व सत्र न्यायालय नांदेड**

**जाहीर प्रगटन देणार**
**मधुकरराव कृष्णाराव बापट**
**रा.गांधीनगर धर्माबाद ता.धर्माबाद**
**जि.नांदेड मो.९३२२०११३५२**


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८




## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस जाहिर प्रगटन द्वारे सर्व संबंधितास कळविण्यात येते की, संस्थेचा सभासद श्रीमती सरजितकौर रनबीरसिंग खोकर यांचा प्लॉट सर्वे नं. ८०, प्लॉट ३१, ज्याची चतुसीमा पूर्वेस रोड, पश्चिमेस प्लॉट नं. २७, दक्षिणेस प्लॉट नं. ३०, उत्तरेस प्लॉट नं. ३२, असून याचे क्षेत्रफळ ६०४०=२४०० असून हा प्लॉट श्रीमती गुरमितकौर जगमिर सिग घुमान यांच्या नावे हस्तांतर करण्यासाठी संबंधितांनी संस्थेकडे भर्ज केलेला माहे. तरी वरिल प्लॉट बाबद कुणास काही आक्षेप उजा मालकी हक्क देवाण - घेवाण, कर्ज गहाण खत इ. असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत संस्थेकडे लेखी कागदपत्रासह आक्षेप नोंदवावा. मुदत संपल्यानंतर कोणाचेही आक्षेप स्विकारल्या जाणार नाही म्हणून नंदीग्राम सहकारी गृह निर्माण संख्या म. नांदेड सादर करीत आहे.

**अध्यक्ष।सचिव**
**नंदीग्राम सहकारी गृहनिर्माण संस्था**
**म. नांदेड १९/०५/२०२५**

## टी. सी. हरवली

माझी मानेमोड काशीनाथ विठ्ठल या नावाची इयत्ता बि.ए ३ (फाईनल इयर) पास ची टि.सी नरसी ते पुणे प्रवास करीत असताना हरवली आहे.कोणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधा.योग्य ते बक्षीस देण्यात येईल

**-संपर्क पत्ता -**
**मानेमोड काशीनाथ विठ्ठल**
**मु.पो कोल्हेबोरगाव ता.बिलोली जि.नांदेड मो.७०२८३४१७१७**

## जाहीर नोटीस

**सुनावणी नोटीस-वर्तमानपत्रात प्रसिध्दी नोटीस**

नांदेड दिनांक :- २७.०५.२०२५
क्रमांक/अपील/एस. आर. १२/२५
प्रति

अपिलार्थी -१. श्री मधुसुदन जिवनराव देशमुख 'रा. छत्रपती चौक पुर्णा रोड नांदेड ता जि.नांदेड २. श्री मोहन जिवनराव देशमुख रा. छत्रपती चौक पुर्णा रोड नांदेड ता जि.नांदेड

विरुध्द

गैर अपिलार्थी- अर्जदार :-१. श्री गौरीशंकर कोन्हेराव देशमुख २. श्री गिरीश गौरीशंकर देशमुख रा.लिंगनकेरुर ता. देगलुर जि.नांदेड

विषय :- महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये अपील. मौजे लिंगनकेरुर ता.देगलुर जि.नांदेड येथील सर्वे नंबर ७१ फाळणीबारा विरुध्द अपील.

महाशय / बाईसाहेब,

उपरोक्त विषयांकित बाबत अपीलदार यांनी इकडील न्यायालयात अपील दाखल केले आहे. सदर अपील प्रकरणी इकडील कार्यालयात दिनांक २४.०६.२०२५ रोजी ठिक ११.३० वाजता सुनावणी ठेवण्यात आलेली आहे.

अपिलार्थी व प्रतिवादी/जाबदार यांनी वर नमुद केलेल्या तारखेस वेळेवर निश्चित ते/स्वतः/ अधिवक्ता/अधिकृत प्रतिनिधी अथवा त्यांचे वारस यांनी जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख नांदेड जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, नांदेड येथे ओळख पत्रासह हजर रहावे, तसेच इतर आवश्यक कागदपत्रे सोबत आणावे व प्रकरणी आपले म्हणणे दाखल करावे.

उपरोक्त नियोजित तारीख व वेळेवर गैरहजर राहिल्यास संबंधित पक्षकाराचे अनुपस्थितीत सुनावणी घेणेत येईल. निकाल दिला जाईल.

**(सिमा देशमुख)**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख नांदेड**

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...
किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# टपाल कार्यालयात महिलांमध्ये हमरीतुमरी

## सेतु सुविधा केंद्र बंद; आधार अपडेटसाठी नागरिकांची गर्दी

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहर व ग्रामीण भागातील सेतु सुविधा केंद्र बंद असल्यामुळे आधार अपडेट करण्यासाठी नागरिकांची शहरातील मुख्य टपाल कार्यालयात गर्दी होत आहे. गुरुवारी या कार्यालयात आधार अपडेटसाठी आलेल्या महिलांमध्ये हमरीतुमरी झाली. यावेळी काही नागरिकांनी मध्यस्थी केल्याने वाद मिटला.



आधार अपडेटसाठी लागणारा वेळ व मोठ्या रांगेमुळे नागरिक वैतागले आहेत. यातून गुरुवार दि. २९ मे रोजी सकाळी महिलांमध्ये 'फ्री' स्टाईल झाली. या प्रकारामुळे आधार अपडेट आणि टपाल कार्यालय सेवेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

शैक्षणिक वर्ष सुरू होण्यास काही दिवसांचा कालावधी शिल्लक आहे. शालेय प्रवेश व इतर कारणांसाठी लागणारे आधार कार्ड लवकर अपडेट करून घेण्यासाठी नागरिक पोस्ट कार्यालयात खेटे मारत आहेत. शहरातील सेतु सुविधा केंद्र अनेक दिवसांपासून बंद आहेत. सेतु सुविधा केंद्राला दिलेली यंत्रसामग्री तात्काळ अपडेट करावी अशी चालकांची मागणी असताना जिल्हा प्रशासन स्तरावर याबाबत उदासीनता दिसून येत आहे. जी केंद्र सुरू आहेत त्या केंद्राचे चालक नागरिकांना टपाल कार्यालयात जाण्याचा सल्ला देत आहेत. त्यामुळे नांदेड शहराबरोबरच ग्रामीण भागातील नागरिकांचीही शहरातील मुख्य टपाल कार्यालयात गर्दी होत आहे. गुरुवारी सकाळच्या वेळी टपाल कार्यालयात वाट पाहून वैतागलेल्या महिलांमध्ये हमरीतुमरीचा प्रसंग उद्भवला. यामध्ये शालेय विद्यार्थ्यांपासून ते आबालवृद्धांपर्यंत सर्वांनाच या प्रकाराचा त्रास झाला. परंतु या कार्यालय प्रशासनाने मात्र हतबलता व्यक्त करत नागरिकांच्या संयमशीलतेवरच खापर फोडले. तर शहरात अन्य जी काही टपाल कार्यालये आहेत, तेथील नियमित कामेच वेळेत होत नाहीत तर आधार अपडेटसाठी गेलेल्यांना मात्र इंटरनेट बंदचे कारण सांगून टाळले जात आहे. केवळ नांदेड शहरच नाही तर बहुतांश तालुक्यातील पोस्ट कार्यालयाला 'इंटरनेट बंदचा' संसर्ग लागल्याचे दिसून येत आहे. त्यातून हमरीतुमरीचे प्रसंग उद्भवत आहेत.

आधारचे जिल्हा समन्वयक मोहेम्मद अब्दुल वसीम शमीम यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की, नांदेड शहरात ४ ते ५ ठिकाणी आधार अपडेट करण्याचे आधार केंद्र आहेत. त्यात आधार अपडेटसाठी ३० ते ४० मिनिटे लागतात. शहरात यासाठी ३० केंद्र असून पोस्ट कार्यालयात आधार लवकर अपडेट होतात, असा नागरिकांमध्ये भ्रम असल्याने ही गर्दी होत असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी सांगितले. या प्रणालीसाठी नांदेड जिल्ह्यात ११० किटचे लवकरच वितरण करण्यात येणार असल्याचेही ते म्हणाले.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त भाजपाच्यावतीने महादेव मंदिर व परिसरात स्वच्छता

**नांदेड (प्रतिनिधी)**– पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टी शहरातील शिवाजीनगर मंडळ भाजपा शाखेच्या वतीने गुरुवार दि. २९ मे रोजी सकाळी शहराच्या चैतन्यनगर येथील महादेव मंदिर व परिसरात साफसफाई करण्यात आली. त्यानंतर विजय येवनकर, मंडळ अध्यक्ष अमित वाघ यांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला.



यावेळी माजी नगरसेवक नागनाथ गड्डम, संतोष मानधने, गिरीश भंडारी, संदीप लहानकर महेश मुखेडकर, संदीप लहानकर, किशन कल्याणकर, तुषार पाटील, संतोष पत्तेवार, अजय यादव, संतोष चव्हाण प्रथम चोधरी, सुनील देबडवार, सीमंत पांडे, साहिल गोयल, आदर्श चौधरी, अर्जुन परदेशी, ऋषिकेश थुले, कृष्णा मंडले, यश कदम यांच्यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. या प्रसंगी अहिल्यादेवी होळकर यांचे सामाजिक कार्य, न्यायप्रियतेची परंपरा आणि जनसेवेतील योगदान याचे स्मरण करण्यात आले. त्यांच्या आदर्श जीवनशैलीचा आदर्श घेऊन समाजसेवेची प्रेरणा घेण्याचा निर्धार व्यक्त केला. या कार्यक्रमातून स्वच्छता व सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देण्यात आला आहे.




**नांदेड** : वीर शिरोमणी श्री महाराणा प्रतापसिंह यांच्या ४८५ व्या जन्मोत्सवानिमित्त श्री क्षत्रिय समाज राजपूत रजि. एफ ११ श्री रेणुकादेवी मंदिर गाडीपुराच्यावतीने श्री रेणुकादेवी मंदिर ते वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांच्या पुतळ्यापर्यंत शोभा यात्रा काढण्यात आली.

# सिडको येथील महाराणा प्रतापसिंह स्मारकाचे सुशोभीकरण डीपीडीसीतून करण्यासाठी प्रयत्न करणार –माजी आ. राजूरकर

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – सिडको येथील महाराणा प्रतापसिंह यांच्या स्मारकासाठी जिल्हा नियोजन निधीतून (डीपीडीसी) सुशोभीकरण करण्यासाठी प्रयत्न करू, अशी ग्वाही माजी आमदार तथा भाजपा महानगर अध्यक्ष अमर राजुरकर यांनी जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी केले.



विरशिरमोणी महाराणा प्रतापसिंह यांच्या ४८५ व्या जयंतीनिमित्त २९ मे रोजी सिडको महाराणा प्रताप सिंह चौक सिडको येथे सकाळी ११ वाजता भगवा ध्वजारोहण, प्रतिमा पुजा, अन्नदान करण्यात आले. यावेळी भाजपा महानगर अध्यक्ष माजी आमदार अमर राजुरकर, प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगरसेवक प्रतिनिधी संजय पाटील घोगरे, माजी नगरसेवक प्रतिनिधी उदय देशमुख, भाजपा प्रदेश सदस्य चैतन्य देशमुख, माजी महापौर प्रतिनिधी विजय येवनकर, माजी सभापती किशोर स्वामी, भालचंद्र पवळे, माजी नगरसेवक उमेश चव्हाण, अमित तेहरा, बाळु खोमणे, अनिल हजारी, विजय गंभीरे, ॲड. दिलीप ठाकूर, रेणुका माता मंदिर समितीचे अध्यक्ष राजुसिंह अग्नीवंशी, रामभक्त आशिष भैय्या चौधरी, सतिश बसवदे, राजु लांडगे यांची उपस्थिती होती.

प्रारंभी महाराणा प्रतापसिंह यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी उपस्थित समाजबांधवांनी महाराणा प्रताप सिंह यांच्या नावाचा जयघोष केला.

माजी आमदार अमर राजुरकर यांनी जयंतीनिमित्त अन्नदान वाटप हा स्तुत्य उपक्रम राबविल्याचे सांगून स्मारक सुशोभीकरण करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.

गजानन चंदेल यांनी प्रास्ताविक करून उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी ज्येष्ठ समाज बांधव प्रकाशसिंह परदेशी, गजानन चंदेल, राजेंद्र चंदेल, सचिन चव्हाण, धिरजसिंह चव्हाण, अमर ब्रास, गोविंद ठाकूर, सुषमा ठाकूर, सरिता बैस, ओम ठाकूर, राहुल चंदेल, ग्यानी ठाकूर, नरसिंह ठाकूर, पवन ठाकूर, सतिश विदेह यांच्यासह सकल राजपूत समाज बांधव उपस्थित होते.

# ईरवंता राजुरकर यांचे निधन

**नायगाव (प्रतिनिधी)**– नरसी येथील ज्येष्ठ नागरिक ईरवंता सायन्ना राजुरकर (वय ८५) यांचे दि. २८ मे रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दि. २९ रोजी गुरुवारी सकाळी १०:३० वाजता नरसी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, जावई, सुना, नातू असा परिवार आहे. राजाराम राजुरकर व भगवान राजुरकर यांचे ते वडील होत.



# पोलीस अधीक्षक कार्यालयात महाराणा प्रतापसिंह जयंती साजरी

**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील पोलीस अधीक्षक कार्यालयात गुरुवार दि. २९ मे रोजी महाराणा प्रतापसिंह जयंती साजरी करण्यात आली. यावेळी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी पोउपनि तथा जनसंपर्क अधिकारी जळबाजी गायकवाड यांच्यासह पोलीस अधीक्षक कार्यालयातील सर्व विभागाचे पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार यांनी महाराणा प्रतापसिंह या महापुरुषास अभिवादन केले. सदर कार्यक्रमाचे आयोजन जनसंपर्क अधिकारी कार्यालयातील ग्रेपोउपनि सुर्यभान कागणे, पोहेकॉ संजय सांगवीकर, पोकों विनोद भंडारे यांनी चांगल्या प्रकारे केले होते.

# लोहा बायपास रस्त्यावरील कमानीस कंटेनर धडकल्याप्रकरणी कंपनीच्या प्रतिनिधीवर गुन्हा दाखल

**लोहा (प्रतिनिधी)**– लोहा शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ च्या वळण रस्त्यावर उभारण्यात आलेल्या उंचीची मर्यादा असलेल्या कमानीला बुधवारी कंटनेर धडकून कमान कोसळली होती. या प्रकरणी के टी एल कंपनीचे उदयकुमार सिंग यांच्या विरुद्ध कलम ३०८ (०२) अन्वये लोहा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

शहरात सध्या राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ च्या वळण रस्त्याचे काम सुरु आहे. शहरातील शिवाजी महाराज चौकातील वाहतुकीची कोंडी दूर करण्यासाठी नांदेड कडून लातूरकडे जाणारी एक मार्गिका सुरू करण्यात आली आहे. दि. २८ रोजी दुपारी साडेचार वाजता लातूर कडून नांदेडकडे जाणारे कंटेनर (आर जे ०९ जी ए ९८९३) उंचीची मर्यादा दर्शविणाऱ्या कमानीला धडकले. त्यानंतर घटनास्थळी के टी एल कंपनीचे कांहीं कर्मचारी दाखल झाले. कंटेनर चालक आणि रस्ते कंपनीच्या कर्मचाऱ्यांत चर्चा होऊन सदरील प्रकरण गुन्हा दाखल न करता आठ हजार रक्कम देऊन मिटविण्यात आले. नेमके त्याच वेळी वरिष्ठ पोलीस अधिकारी त्याच मार्गावरून जात असताना वाहतूक कोंडी संदर्भात त्यांनी आढावा घेतला असता त्यांना सदर प्रकरणाची गांभीर्य लक्षात आले. त्यांनी स्थानिक पोलिसांना कार्यवाहीचे आदेश दिल्यानंतर के टी एल कंपनीचे उदयकुमार सिंग यांच्या विरुद्ध कलम ३०८ (०२) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# महानगरपालिकेच्यावतीने महाराणा प्रतापसिंह यांना अभिवादन

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या वतीने दि.२९ मे रोजी सकाळी ७.३० वाजता महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंतिनिमित्त महाराणा प्रतापसिंह चौक, हिंगोली रोड येथील स्थित अश्वारूढ पुतळ्यास उपायुक्त सुप्रिया टवलारे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपायुक्त नितीन गाढवे, उपायुक्त अजितपालसिंघ संधु, क्षेत्रिय अधिकारी तथा उद्यान अधीक्षक डॉ.मिर्झा फरहतुल्ला बेग, सहाय्यक आयुक्त गुलाम सादेक, क्षेत्रिय अधिकारी राजेश जाधव, कार्यकारी अभियंता विश्वनाथ स्वामी, उद्यान सहाय्यक उल्हास महाबळे, तसेच क्षत्रिय समाजाचे समाज बांधव, मनपाचे अधिकारी-कर्मचारी व शहरातील नागरीकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# एक किलो गांजासह दोघांना अटक; स्थागुशाची कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील देगलूर नाका परिसरातील पाकिजा फंक्शन हॉल समोरील मोकळ्या जागेत दोन आरोपी एक किलोग्रॅम गांजाची अवैध विक्री करीत होते. त्या ठिकाणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई करून एक किलो गांजा जप्त दोघांनाही अटक केली आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत अवैध धंद्यांवर कायदेशीर कारवाई करणे बाबत स्थानिक गुन्हे शाखेला आदेशित केले होते. त्या अनुषंगाने दि.२८ मे रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे, आनंद बिच्चेवार व त्यांच्या पथकाला गोपनीय माहिती मिळाली. त्यानंतर पथकाने नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीतील पाकीजा फंक्शन हॉल समोरील असलेल्या गटारा जवळील मोकळ्या जागेत हतई करबला येथील रहिवासी आरोपी मोहम्मद अली मोहम्मद चाऊस उर्फ बाबू व पाकिजा फंक्शन हॉल मागील हिलालनगर येथील रहिवासी आरोपी मोहम्मद रिजवान मोहम्मद दस्तगीर हे दोघेजण गांजा विक्री करीत असल्याचे आढळले. तेथे छापा टाकून पथकाने त्यांच्याकडील १.०५० किलोग्रॅम गांजा (किंमत २१ हजार रुपये) जप्त केला. जप्त मुद्देमाल व दोन्ही आरोपींना नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशन यांच्या ताब्यात देऊन गुन्हा दाखल करण्यात आला.

या कारवाईबद्दल स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, पोउपनी महेश कोरे, आनंद बिच्चेवार, पोलीस हवालदार मिलिंद नरबाग, प्रभाकर मलदोडे, रवी बामणे, गंगाराम जाधव, पोलीस शिपाई विश्वनाथ पवार, राजेश डोंगरे, चालक बिचकेवार यांचे पोलीस अधीक्षकांनी कौतुक केले.

# बोधडीच्या सरपंचाविरुद्ध अविश्वास प्रस्ताव मंजूर

**किनवट (प्रतिनिधी)**– तालुक्यातील बोधडी (बु.) ग्राम पंचायतीचे लोकनियुक्त सरपंच बालाजी भिसे यांच्याविरोधात ग्रामपंचायतीच्या १५ सदस्यांनी दाखल केलेला अविश्वास प्रस्ताव बुधवारी दि.२८ विशेष सभेत १५ विरुद्ध ३ मतांनी मंजूर करण्यात आला.




गोकुंद्यानंतरची मोठी ग्राम पंचायत म्हणून ओळख असलेल्या बोधडी (बु.) ग्रामपंचायतीत गेल्या काही दिवसांपासून लोकनियुक्त सरपंच बालाजी भिसे व ग्राम पंचायत सदस्यांत बेबनाव होता. यातूनच मीना बानाटे, पाणोजी तोरकड, संजीवनी थोरात, त्रिशला शेळके, अनसूया जमादार, संदीप सावंत, दैवशाला भिसे, अनिता मुंडे, संदीप लाखाडे, राधा आमले, सुनील घुगे, गणेश गवले, मंगल कोतवाल, सुलोचना दराडे व माणिक पेंदोर या सदस्यांनी सरपंच भिसे हे गावातील विकासकामे करण्यात असमर्थ ठरत आहेत, ग्रामपंचायतीच्या कारभारात सदस्यांना विश्वासात घेत नाहीत, विकासकामांबाबत सदस्यांनी विचारणा केल्यास उद्धट व अरेरावीची उत्तरे देतात. कोणकोणत्या योजनेसाठी किती निधी आला, याची माहिती न देणे, ग्रामपंचायत निधी व करवसुलीत अपहार करणे, गावातील सार्वजनिक स्वच्छतेकडे दुर्लक्ष करणे, मासिक सभेत महिला सदस्यांसमोर अश्लिल भाषेचा वापर करणे, मासिक सभेचे प्रोसिडींग बूक ग्रामसेवकाऐवजी स्वतःच्या ताब्यात ठेवणे, व्यापारी गाळ्यांचे जाहीर लिलाव न करता आपल्या मर्जीतल्या लोकांना गाळे देणे, अशी कारणे देत दि.२६ मे रोजी सरपंच भिसे यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव दाखल केला. सदर अविश्वास प्रस्तावावर चर्चा, मतदानासाठी दि.२८ मे रोजी ग्रामपंचायत कार्यालयात तहसीलदार शारदा चौंडेकर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभा पार पडली. यात १५ विरुद्ध ३ अशा मतांनी सरपंच बालाजी भिसे यांच्याविरुद्धचा अविश्वास प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com